महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# उमेदवारांना सर्वसाधारण सूचना

**(स्पर्धा परीक्षा, सरळसेवा भरती, मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा यांकरीता एकत्रित सूचना)**

दिनांक १७ जानेवारी, २०२३

# महत्वाची सूचना

आयोगामार्फत आयोजित भरतीप्रक्रियेकरीता अर्हता, अर्ज सादर करण्याची पध्दती, पात्रतेसंदर्भातील प्रमाणपत्रे, भरतीप्रक्रियेतील आरक्षण, भरती प्रक्रियेचे टप्पे, निकाल प्रक्रिया, परीक्षेमधील गैरप्रकार ठरु शकणा-या कृती इत्यादी बाबींची सर्वसाधारण माहिती व्हावी, या हेतूने प्रस्तुत सूचना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. प्रस्तुत सूचनांमधील कोणतीही तरतूद, आयोगाची कार्यनियमावली, संबंधित पदाचे सेवाप्रवेश नियम, शासन आदेश, आयोगाचे तत्कालीन धोरण यामधील तरतुदींशी विसंगत असल्याचे आढळून आल्यास आयोगाची त्या त्या वेळची कार्यनियमावली अथवा संबंधित पदभरतीची जाहिरात अथवा सेवा प्रवेश नियम अथवा शासन आदेश अथवा आयोगाचे तत्कालिन धोरण यामधील तरतुदी अंतिम समजण्यात येतील.

# अनुक्रमणिका

१ सर्वसाधारण सूचना / माहिती १

१.१ पदभरतीकरीता जाहिरात ........ १

१.२ अर्ज प्रक्रियेसंबंधी सूचना ........ १

१.३ उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध सोयी-सुविधा ........ ६

१.४ अर्जामधील दाव्यांसंदर्भात सूचना ........ ६

१.५ आयोगाशी पत्रव्यवहार/संपर्क ........ ७

२. पात्रता / अर्हता, वयोमर्यादा, अनुभव, अपात्रता इत्यादी ८

२.१ सर्वसाधारण पात्रता ........ ८

२.२ अर्हता व अर्हता धारण केल्याचा दिनांक ........ ८

२.३ वयोमर्यादा ........ ९

२.४ लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन ........ १०

२.५ संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान ........ १०

२.६ निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया ........ १०

२.७ अपात्रता ........ १२

२.८ उमेदवारी संदर्भातील बदल ........ १२

२.९ बायोमॅट्रिक पडताळणी :- ........ १२

३. आरक्षण व तदनुषंगिक तरतुदी १४

३.१ आरक्षणाचे प्रकार ........ १४

३.२ आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी ........ १४

३.३ उभे आरक्षण / सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण ........ १४

३.४ विविध सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठींच्या आरक्षणासंदर्भातील अटी ........ १५

३.५ समांतर आरक्षण ........ १६

३.६ महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील उमेदवारांसदर्भातील तरतुदी ........ २७

४. कागदपत्रे / पुरावा २८

४.१.१ वयाचा पुरावा ........ २८

४.१.२ शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा ........ २८

४.१.३ मागासवर्गीय उमेदवार असल्याबद्दल पुरावा ........ २८

४.१.४ नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र ........ २९

४.१.५ मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा ........ २९
४.१.६ दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा ........ २९
४.१.७ माजी सैनिक असल्याचा पुरावा ........ २९
४.१.८ महिला आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा :- ........ २९
४.१.९ खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा ........ २९
४.१.१० अनाथ असल्याचा पुरावा:- ........ २९
४.१.११ प्रकल्पग्रस्त असल्याचा पुरावा:- ........ ३०
४.१.१२ भूकंपग्रस्त असल्याचा पुरावा :- ........ ३०
४.१.१३ पदवीधर अंशकालीन कर्मचारी असल्याचा पुरावा:- ........ ३०
४.१.१४ विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा ........ ३०
४.१.१५ लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन ........ ३०
४.१.१६ अनुभवाचा पुरावा ........ ३०
४.२.१७ वैध अनुज्ञप्तीचा (Licence) पुरावा (फक्त सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षेकरीता) ........ ३०
४.१.१८ अर्हता, अनुभव व मराठीचे ज्ञान असल्याचा पुरावा (फक्त दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षेकरीता) ........ ३०
४.१.१९ ओळखपत्राबाबत ........ ३१
४.१.२० प्रमाणपत्राचे नमुने ........ ३१

**५. परीक्षा, शारीरिक चाचणी, मुलाखत इत्यादी ३२**

**६. निकाल प्रक्रिया ३५**

**६.१ उत्तरतालिका (Answer-key) ........ ३५**

**६.२ उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन ........ ३५**

**६.३ गुणांची सीमारेषा ........ ३५**

**६.४ गुणांची पडताळणी करण्याबाबतची पद्धत ........ ३५**

**६.५ समान गुण धारण करणा-या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी ........ ३५**

**६.६ अंतिम निकाल व भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे (ऑप्टिंग आऊट)(स्पर्धा परीक्षांना लागू): ........ ३६**

**६.७ शिफारस ........ ३६**

**६.८ प्रतीक्षा यादी ........ ३६**

**६.९ गुणपत्रिका ........ ३७**

**६.१० उत्तरपत्रिकेची प्रत व इतर तपशील ........ ३७**

**७. सर्वसाधारण तरतुदी, सेवाप्रवेशोत्तर शर्ती इत्यादी ३८**

**७.१ सर्वसाधारण तरतुदी ........ ३८**

**७.२ महसुली विभाग वाटप नियम ........ ३८**

**७.३ कामाचे ठिकाण आणि पदग्रहण अवधी ........ ३८**

**७.४ परिविक्षा कालावधीतील वेतन ........ ३८**

७.५ सेवाप्रवेशोत्तर शर्ती........................................................................................................................................ ३८
८. प्रश्नपत्रिका / प्रश्नपुस्तिका तसेच उत्तरपत्रिका / उत्तरपुस्तिका हाताळणी ४०
९. गैरप्रकार / गैरप्रकाराचे प्रयत्न प्रकरणी कारवाई ४१

९.१ गैरप्रकार ........................................................................................................................................ ४१

९.२ गैरप्रकार प्रकरणी कारवाई........................................................................................................................................ ४२

**प्रकरण क्रमांक - एक**

# सर्वसाधारण सूचना / माहिती

## १.१ पदभरतीकरीता जाहिरात:-

१.१.१ महाराष्ट्र शासनाकडून शासन सेवेतील राजपत्रित संवर्गातील गट-अ व गट-ब ची सर्व पदे, काही अराजपत्रित गट-ब संवर्गातील पदे व गट-क संवर्गातील लिपिकवर्गीय पदे इत्यादी पद/संवर्गाच्या सरळसेवा भरतीसाठी प्राप्त होणा-या मागणीपत्राच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर विस्तृत जाहिरात तसेच राज्यातील विविध प्रमुख वृत्तपत्रांमध्ये संक्षिप्त जाहिरात प्रसिध्द केली जाते. सदर जाहिरातींमध्ये संवर्ग/पदांचा तपशील, भरावयाची एकूण पदसंख्या, शासनाच्या मागणीनुसार विविध प्रवर्गाकरीता आरक्षित पदे, वयोमर्यादा, अर्हता, परीक्षेचा दिनांक, इत्यादी तपशील दिलेला असतो.

१.१.२ कोणत्याही वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहिरात तसेच आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणारी जाहिरात यामध्ये तफावत/विसंगती आढळून आल्यास आयोगाच्या संकेतस्थळावरील जाहिरात अधिकृत समजण्यात येते.

१.१.३ संबंधित संवर्ग/पदाच्या/परीक्षेच्या जाहिरात/अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता अजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

१.१.४ एखाद्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याची टप्पेनिहाय सविस्तर प्रक्रिया आयोगाच्या https://mpsconline.gov.in या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर उमेदवारांना सुलभतेसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

## १.२ अर्ज प्रक्रियेसंबंधी सूचना :-

१.२.१ आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा/भरतीकरीता पात्र उमेदवाराला आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन आयोगाच्या https://mpsconline.gov.in या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

१.२.२ विहित पध्दतीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही पध्दतीने सादर केलेले/पाठविलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरले जाणार नाहीत. तसेच ऑफलाईन अर्जासोबत परीक्षा शुल्क पाठविण्यात आलेली रक्कम, डिमांड ड्राफ्ट, चेक इत्यादीच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

१.२.२ ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे:-

(१) नोंदणी / नवीन प्रोफाईल निर्माण करणे.
(२) प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.
(३) अर्ज सादरीकरण.
(४) परीक्षा शुल्क भरणा
(५) परीक्षा जिल्हाकेंद्र निवड (लागू असल्यास)
(६) विहित कागदपत्रे अपलोड करणे (लागू असल्यास)

### १.२.३ नोंदणी / नवीन प्रोफाईल निर्माण करणे :-

१.२.३.१ प्रोफाईल निर्मितीसाठी उमेदवाराने आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमध्ये सर्वप्रथम नोंदणी करणे आवश्यक आहे.

१.२.३.२ नोंदणी करताना उमेदवाराने स्वत:चाच वैध ईमेल आयडी, वैध मोबाईल क्रमांक, जन्मदिनांक इत्यादी तपशील अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सुरक्षाविषयक प्रश्नांची उत्तरे शक्यतो अचूक अथवा ठराविक कालावधीनंतरही विस्मरण होणार नाही; यापध्दतीने देणे उमेदवारांच्या हिताचे राहिल.

१.२.३.३ नोंदणीकरीता वापरण्यात आलेल्या तपशीलामध्ये नंतर बदल करण्याची उमेदवारास मुभा राहणार नाही.

१.२.३.४ आयोगाच्या संकेतस्थळावर यापूर्वी नोंदणी/प्रोफाईल निर्मिती केलेल्या व्यक्तीस पुन्हा नोंदणी अथवा प्रोफाईल निर्मिती करण्याची आवश्यकता नाही. आयोगाकडून परवानगी देण्यात आलेल्या बाबींकरीताच प्रोफाईलमधील तपशील अद्ययावत करता येईल.

### १.२.४ प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे:-

१.२.४.१ नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उमेदवाराने स्वत:च्या लॉगिन आयडी व पासवर्डद्वारे प्रवेश करुन प्रोफाईल निर्मिती या पर्यायावर क्लिक करावे. वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करुन ती जतन करावी.

१.२.४.२ वैयक्तिक माहिती:-

(एक) 'आधार'विषयक तपशील:-

(१) उमेदवाराने स्वत:चा आधार विषयक तपशील जसाच्या तसा विहित पध्दतीने नमूद करणे आवश्यक आहे. आधारविषयक तपशील व उमेदवाराने नमूद केलेले नाव यामध्ये तफावत असल्यास आधार पडताळणी पूर्ण होऊ शकणार नाही.

(२) उमेदवार आधार विषयक तपशील आयोगास सादर करु इच्छित नसल्यास उमेदवारास त्याच्या प्रोफाईलच्या अनुषंगाने पर्यायी व्यवस्थेद्वारे ओळख पडताळणीकरीता आवश्यक मूळ कागदपत्रांसह आयोगाच्या संबंधित अधिका-यांच्या पूर्वपरवानगीने पूर्वनिश्चित दिनांकास आयोगाच्या मुख्य कार्यालयात व्यक्तीश: उपस्थित रहावे लागेल.

(दोन) वैयक्तिक तपशील:-

(१) प्रोफाईलमध्ये माहिती/तपशील नमूद करताना संबंधित सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे.

(२) आडनाव, स्वत:चे नाव, मधले नाव इत्यादी तपशील स्वतंत्र दर्शवावा.

(३) स्वत:च्या संपूर्ण नावासंदर्भातील एकत्रित तपशील एसएससी अथवा तत्सम समान दर्जाच्या अर्हता प्रमाणपत्राप्रमाणे नमूद करावा. उमेदवाराने अशाप्रकारची अर्हता धारण केलेली नसल्यास एचएससी अथवा पदवी प्रमाणपत्राप्रमाणे नावाचा तपशील नमूद करावा.

(४) प्रोफाईलमधील १.३ येथे नमूद संपूर्ण नाव भरतीप्रक्रियेच्या सर्व टप्प्यावर म्हणजेच अर्ज, प्रवेशप्रमाणपत्र, निकाल प्रक्रिया, शिफारस इत्यादी ठिकाणी वापरले जात असल्यामुळे सदर रकाना भरताना अत्यंत काळजी घ्यावी. प्रोफाईलमध्ये व पर्यायाने भरतीप्रक्रियेसाठी विचारात घेण्यात आलेला सदर तपशील नंतर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाही.

(५) वरीलप्रमाणे इंग्रजीमधील नाव नमूद केल्यानंतर उमेदवाराचे देवनागरीमधील नाव संबंधित रकान्यात आपोआप दिसेल, तथापि, अशाप्रकारे देवनागरीमध्ये दिसणा-या नावामध्ये तफावत असण्याची शक्यता आहे. यास्तव, उमेदवाराने देवनागरीमध्ये योग्य अक्षरांचा पर्याय निवडून अचूक नाव नोंदवावे.

(६) विवाहित महिला उमेदवार किंवा कोणत्याही कारणास्तव नावात बदल केलेल्या उमेदवारांनी अर्जामध्ये एसएससी अथवा तत्सम अर्हता धारण करताना त्यांचे जे नाव होते, त्याच नावाने अर्ज करणे अनिवार्य आहे.

(७) अर्जामध्ये नमूद केलेले नाव व ओळखीच्या पुराव्याच्या अनुषंगाने वेळोवेळी आयोगाकडे सादर करावयाचे ओळखपत्र यामध्ये कालपरत्वे बदल झाला असल्यास प्रस्तुत बदलाच्या अनुषंगाने नावात बदल झाला असल्याबाबत राजपत्राची प्रत आयोगाच्या मागणीनुसार सादर करणे अनिवार्य राहील.

(८) महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असल्याबाबत तसेच विविध आरक्षणाच्या दाव्यांच्या (मागासवर्गीय, महिला, दिव्यांग, अनाथ, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर अंशकालीन कर्मचारी इत्यादी) अनुषंगाने अचूक माहिती प्रोफाईलमध्ये नमूद करावी. सदर माहितीमध्ये वेळोवेळी होणा-या बदलानुसार प्रोफाईल अद्ययावत करावे.

(९) आरक्षण विषयक कोणतेही लाभ अनुज्ञेय ठरण्यासाठी उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारण रहिवासी असणे व अर्जाद्वारे सुस्पष्ट दावा करणे अनिवार्य आहे.

(१०) जात व वर्गवारी विषयक तपशील नमूद करण्यापूर्वी प्रस्तुत सूचनांमधील 'आरक्षण' या प्रकरणाचे अवलोकन करणे उमेदवाराच्या हिताचे राहील.

(११) शारीरिक अर्हता असलेल्या संवर्ग/पदांकरीता विहित व अचूक शारीरिक तपशील नमूद करणे आवश्यक राहील.

१.२.४.३ संपर्क तपशील:-

(१) स्थायी निवासाचा तपशील व संपर्काचा पत्ता अचूकपणे नमूद करणे व कालपरत्वे होणा-या बदलानुसार वेळोवेळी अद्ययावत करणे भविष्यातील पत्रव्यवहार सुकर होण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

(२) व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देऊ नये.

(३) एखाद्या परीक्षेकरीता उमेदवाराने जिल्हाकेंद्राची निवड न केल्यास अथवा निवड केलेल्या जिल्हाकेंद्रावर बैठक व्यवस्था होण्यास कोणत्याही कारणाने अडचणी उद्भवल्यास अथवा एखाद्या भरतीकरीता अर्ज सादर करताना जिल्हाकेंद्राच्या निवडीचा पर्याय नव्हता, तथापि तदनंतर सदर भरतीकरीता परीक्षेच्या आयोजनाचा निर्णय झाल्यास उमेदवाराच्या स्थायी/कायमस्वरुपी निवासाच्या तपशीलाच्या आधारे त्यास जिल्हाकेंद्र उपलब्ध करुन दिले जात असल्यामुळे, सदर तपशील अचूकपणे नोंदविण्याबाबत विशेष दक्षता घ्यावी.

१.२.४.४ इतर माहिती:-

(एक) माजी सैनिक:-

(१) उमेदवार स्वत: माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत अर्जाद्वारे स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

(२) माजी सैनिकांची व्याख्या व त्यांच्यासाठी असलेले आरक्षण व सवलती यांकरीता 'आरक्षण' या प्रकरणाचे अवलोकन करणे उमेदवाराच्या हिताचे राहील.

(३) शहीद सैनिकांच्या कुटुंबातील एक व्यक्ती वगळता[१], माजी सैनिकांचे पाल्य यांच्याकरीता माजी सैनिकांचे आरक्षण व सोयीसुविधा अनुज्ञेय नाहीत.

(दोन) महाराष्ट्र शासनाचे कर्मचारी:-

(१) महाराष्ट्र शासनाचे कर्मचारी या संज्ञेत केवळ महाराष्ट्र शासनाच्या एकत्रित निधीमधून वेतन मिळणा-या कर्मचा-यांचा समावेश होतो.

---

[१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक १०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दिनांक २ सप्टेंबर १९८३

(२) शासकीय कर्मचारी याचा अर्थ महाराष्ट्र राज्याच्या कामकाजासंबंधातील कोणत्याही सेवेत किंवा पदावर नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती असा आहे आणि त्यामध्ये ज्याची सेवा कंपनीकडे, महामंडळाकडे, संघटनेच्या स्थानिक प्राधिकरणाकडे किंवा अन्य कोणत्याही शासनाकडे सोपविलेली असेल, मग त्याचे वेतन राज्याच्या एकत्रित निधिव्यतिरिक्त अन्य मार्गाने काढले जात असेल तरीही अशा शासकीय कर्मचा-याचा समावेश होतो.

(३) महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या दाव्यांच्या पुष्ट्यर्थ स्वत:चा 'सेवार्थ आयडी' अचूकपणे नोंदविणे व तो विहित पध्दतीनुसार वैध होणे अनिवार्य आहे.

(४) विविध स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, महानगरपालिका, नगरपालिका / नगरपरिषद, नगरपंचायत, छावणी मंडळ, विद्यापीठ, शासन अनुदानित शाळा / महाविद्यालये, राज्य शासनाची महामंडळे, राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम इत्यादींच्या सेवेतील कर्मचा-यांचा समावेश महाराष्ट्र शासनाचे कर्मचारी या संज्ञेत होत नाही.

(तीन) बृहन्मुंबई महानगरपालिका व बेस्टच्या कर्मचा-यांकरीता त्यांच्याशी संबंधित पदांकरीता असलेल्या सवलती / लाभ केवळ नियमित व स्थायी कर्मचा-यांना अनुज्ञेय ठरतात.

(चार) पात्र गुणवत्ताधारक खेळाडू:-

(१) पात्र खेळाडू आरक्षणाचा आणि/अथवा सोयी सवलतींचा दावा करण्यापूर्वी उमेदवाराने प्रस्तुत सूचनांधील 'आरक्षण' या प्रकरणामधील प्राविण्यप्राप्त खेळाडूंच्या आरक्षणासंदर्भातील सूचनांचे अवलोकन करणे उमेदवाराच्या हिताचे राहील.

(२) क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवालानुसार उमेदवारास ज्या गटातील संवर्ग/पदांवरील नियुक्तीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे, केवळ त्याच गटातील पदांकरीता आरक्षणविषयक लाभ अनुज्ञेय असल्याने उमेदवाराने त्याप्रमाणे गटाचा अचूक तपशील नमूद करणे अनिवार्य आहे.

(३) प्राविण्यप्राप्त खेळाडूच्या दाव्याच्या अनुषंगाने क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवालाचा तपशील व वैध क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची स्कॅन प्रत आयोगाच्या सूचनांनुसार वेळोवेळी उपलब्ध करुन देणे अथवा अपलोड करणे अनिवार्य आहे.

(४) उमेदवाराने वेळोवेळी धारण केलेली क्रीडाविषयक अर्हता प्रोफाईलमध्ये नमूद करणे अनिवार्य आहे.

१.२.४.५ शैक्षणिक अर्हता:-

(१) उमेदवाराने एसएससी अथवा तत्सम समान दर्जाच्या अर्हतेपासून धारण केलेल्या सर्व अर्हतांचा तपशील प्रोफाईलमध्ये नमूद करावा.

(२) प्रोफाईलमध्ये नमूद शैक्षणिक अर्हतेच्या आधारे संबंधित संवर्ग / परीक्षेकरीता पात्रता आजमावली जात असल्यामुळे शैक्षणिक अर्हताविषयक माहिती नमूद करुन जतन करताना संबंधित पदवीच्या महत्वाच्या विषयाची नोंद घेण्याची दक्षता घ्यावी.

(३) शैक्षणिक अर्हतेसंदर्भात संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक मानण्यात येईल व त्याच्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविण्यात येईल.

(४) संबंधित शैक्षणिक अर्हतेच्या अभ्यासक्रमातील सर्व सत्रांच्या सर्व परीक्षा विहित दिनांकापूर्वी उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. अगोदरच्या सत्रातील/वर्षातील परीक्षेत अनुत्तीर्ण असल्यामुळे कोणत्याही टप्प्यावरील निकाल राखून ठेवण्यात आला असल्यास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण केली असे मानण्यात येणार नाही.

(५) शैक्षणिक अर्हतेच्या सविस्तर तरतुदींच्या अनुषंगाने 'पात्रता/अर्हता, वयोमर्यादा, अनुभव, अपात्रता, इत्यादी' या प्रकरणामधील तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवाराच्या हिताचे राहील.

(६) आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीमध्ये नमूद नसलेली तथापि, संबंधित भरतीप्रकियेच्या दृष्टीने आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता समाविष्ट करण्याबाबत आवश्यक पुराव्यांसह उमेदवारांनी विनंती केल्यास सदर अर्हता ऑनलाईन अर्जप्रणालीमध्ये समाविष्ट केली जाईल. तथापि, भरतीप्रक्रियेच्या दृष्टीने महत्वाची नसलेली/संबंधित प्राधिकाऱ्यांची मान्यता नसलेली आणि/अथवा अर्हता समाविष्ट केली जाणार नाही.

१.२.४.६ अनुभव:-

(१) खाजगी, शासकीय, निम-शासकीय, व्यावसायिक वगैरे सर्व प्रकारचे अनुभव कालाक्रमानुसार भरावेत.

(२) अनुभवासंदर्भातील सविस्तर तरतुदींच्या अनुषंगाने 'पात्रता/अर्हता, वयोमर्यादा, अनुभव, अपात्रता, इत्यादी' या प्रकरणामधील तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवाराच्या हिताचे राहील.

(३) प्रोफाईलमध्ये नमूद अनुभवाच्या आधारे संबंधित पदभरतीकरीता पात्रता आजमावली जात असल्यामुळे अनुभवविषयक माहिती अचूकपणे नमूद करुन जतन करावी.

१.२.४.७ छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करणे:-

उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र व स्वच्छ पांढ-या कागदावर काळ्या शाईच्या पेनने केलेली स्वाक्षरी व्यवस्थितपणे स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे.

१.२.४.८ छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करण्यासंदर्भात खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे:-

(एक) छायाचित्र:-

(१) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या एक वर्षांहून आधी काढलेले नसावे आणि ते निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराशी सर्वसाधारणपणे जुळणारे असावे.

(२) छायाचित्र पासपोर्ट आकारमानाचे, रंगीत व केवळ उमेदवाराचा केसांसह चेहरा दर्शविणारे असावे.

(३) छायाचित्रातील उमेदवार/व्यक्तीचा चेहरा समोरच्या बाजूला असावा.

(४) छायाचित्रामध्ये उमेदवार/व्यक्तीच्या मागील बाजूस साधारणपणे लाल / हिरवा / निळा भरीव रंगाचा (Solid color) पडदा असावा. नक्षीकाम केलेला किंवा बहुरंगी किंवा परावर्ती / चकाकता पडदा वापरु नये.

(५) छायाचित्र फाटलेले अथवा घडी पडलेले असू नये. तसेच, छायाचित्रावर स्वाक्षरी किंवा शिक्का किंवा डाग किंवा टाचणीची छिद्रे असू नयेत.

(६) छायाचित्र स्कॅन करताना छायाचित्रातील व्यक्ती स्पष्टपणे दिसत असल्याची खात्री करावी. छायाचित्रातील व्यक्तीच्या चेह-यावर ओळखता येणार नाही इतपत अंधार किंवा उजेड पडणार नाही, याची दक्षता घ्यावी.

(दोन) स्वाक्षरी:-

(१) उमेदवाराने स्वच्छ पांढ-या कागदावर काळ्या शाईच्या पेनने स्वत: स्वाक्षरी करावी.

(२) उमेदवाराची स्वाक्षरी सर्वसाधारणपणे त्याच्या इतर कागदपत्रे / प्रमाणपत्र / बँक खाते यांमधील स्वाक्षरीशी मिळतीजुळती असावी.

(३) केवळ मराठी किंवा इंग्रजी आद्याक्षराद्वारे स्वाक्षरीस परवानगी नाही.

(तीन) परीक्षेच्या वेळी अथवा मुलाखत / शारीरिक चाचणीच्या वेळी अथवा अन्य कोणत्याही वेळी उमेदवाराने भरती प्रक्रियेशी संबंधित कागदपत्रांवर केलेली स्वाक्षरी व अर्ज भरताना प्रोफाईलमध्ये अपलोड केलेली स्वाक्षरी यामध्ये तफावत आढळल्यास तसेच, स्वत: मूळ उमेदवार अथवा उमेदवाराच्या कोणत्याही ओळखपत्रावरील छायाचित्रातील व्यक्ती व उमेदवाराने अर्ज सादर करताना प्रोफाईलमध्ये अपलोड केलेल्या छायाचित्रातील व्यक्ती यामध्ये तफावत आढळल्यास संबंधित भरतीकरीता उमेदवारास प्रवेश नाकारण्यासह, अर्जामध्ये चुकीची / दिशाभूल करणारी माहिती देऊन गैरप्रकाराचा प्रयत्न केला असल्याचे समजून आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार कारवाई करण्यात येईल.

(चार) उमेदवाराने प्रोफाईलमध्ये सादर केलेले छायाचित्र व स्वाक्षरी अस्पष्ट असल्याचे अथवा उमेदवाराची ओळख पटविण्यास असमर्थ असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित भरतीकरीता उमेदवारास प्रवेश नाकारला जाऊ शकतो, यास्तव छायाचित्र व स्वाक्षरी पुरेसे स्पष्ट व नजीकच्या काळातील असल्याबाबत उमेदवारांनी स्वत: खात्री करावी.

१.२.४.८ कोणत्याही जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार प्रोफाईलमधील तपशीलात योग्य ते बदल किंवा अतिरिक्त माहितीचा समावेश करुन प्रोफाईल अद्ययावत करावे. त्यासाठी वापरकर्त्याने "माझे खाते" अंतर्गत असलेला "प्रोफाईल अद्ययावत करा" हा पर्याय निवडावा.

### १.२.५ अर्ज सादरीकरण:

१.२.५.१ आयोगाने एखाद्या पदभरतीकरीता जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर संबंधित जाहिरातीस अनुसरुन प्रत्येकवेळी विहित पध्दतीने स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. तथापि, प्रत्येक वेळी नव्याने नोंदणी अथवा नवीन प्रोफाईल निर्मिती करण्याची आवश्यकता नाही.

१.२.५.२ आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर उमेदवाराने स्वत:च्या नोंदणीकृत ईमेल आयडी अथवा भ्रमणध्वनी क्रमांक व पासवर्डद्वारे यशस्वीरित्या लॉगिन केल्यानंतर 'ऑनलाईन अर्ज' या सदराखाली एखाद्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक सुरु असलेल्या परीक्षा / संवर्गाबाबतच्या उपलब्ध यादीमधील संबंधित उमेदवार पात्र असलेल्या परीक्षा / संवर्गाकरीता उमेदवारास अर्ज करता येईल.

१.२.५.३ प्रोफाईलमधील तपशीलाच्या आधारे संबंधित परीक्षा / संवर्गासाठीची उमेदवाराची पात्रता तपासली जाईल. जाहिरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास उमेदवाराला अर्ज सादर करता येईल. वापरकर्त्यांच्या प्रोफाईलमधील माहिती अर्जावर प्रदर्शित होईल. तदनंतर अर्जावरील उर्वरित माहिती (लागू असल्यास) भरुन अर्ज सादर करावा.

१.२.५.४ संबंधित परीक्षा/संवर्गाच्या जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष उमेदवार पूर्ण करीत नसल्यास सदर परीक्षा / संवर्गाकरीता उमेदवारास अर्ज सादर करता येणार नाही. जाहिरातीमधील निकष पूर्ण करुनही उमेदवारास अर्ज सादर करण्यात अडचणी येत असल्यास प्रोफाईलमधील अर्हताविषयक तपशील योग्य असल्याची खात्री करावी तसेच आवश्यकतेनुसार प्रोफाईल अद्ययावत करुन पुन्हा अर्ज सादर करण्याची कार्यवाही करावी.

१.२.५.५ एखाद्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर तो फक्त संबंधित जाहिरातीस अनुसरुन राबविण्यात येणा-या निवडप्रक्रियेकरीताच विचारात घेण्यात येईल.

१.२.५.६ कोणत्याही जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यापूर्वी प्रोफाईलमध्ये आवश्यक सुधारणा केल्यास सदर सुधारणा संबंधित अर्जामध्ये समाविष्ट होऊ शकतील. अर्ज सादर केल्यानंतर प्रोफाईलमध्ये केलेले बदल सादर केलेल्या अर्जामध्ये समाविष्ट होऊ शकणार नाहीत, तसेच आयोगास सादर केलेल्या अर्जामध्ये बदल करण्याबाबतची उमेदवाराची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

१.२.५.७ स्पर्धा परीक्षेच्या पूर्व परीक्षेकरीता / सरळ सेवा भरतीकरीता सादर केलेल्या अर्जातील दावे (उदा. अधिवास, दिव्यांग, माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर अंशकालीन कर्मचारी, जातीचा प्रवर्ग, उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याचा दावा, शासकीय कर्मचारी, बृह्न्मुंबई महापालिका / बेस्ट कर्मचारी इत्यादी) मुख्य परीक्षा / सरळसेवा भरतीच्या मुलाखतीकरीता ग्राह्य / अंतिम समजण्यात येतील. त्यामध्ये संबंधित मुख्य परीक्षेकरीता / सरळसेवा भरतीकरीता कोणताही बदल करता येणार नाही.

१.२.५.८ स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करताना पदवी परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी अर्ज सादर करताना फक्त पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक व संबंधित तपशील अद्ययावत करता येईल.

१.२.५.९ स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत टंकलेखन अर्हता आवश्यक असलेल्या संवर्गाच्या भरतीकरीता टंकलेखनाच्या परीक्षेस उमेदवार असलेल्या उमेदवारांना संबंधित जाहिरातीस अनुसरुन आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या विशिष्ट दिनांकापर्यंत फक्त टंकलेखन प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचा दिनांक व संबंधित तपशील अद्ययावत करता येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

### १.२.६ परीक्षा शुल्क भरणा:-

१.२.६.१ पदभरतीकरीता विज्ञापित करण्यात आलेल्या जाहिरात /अधिसूचनेमध्ये नमूद केल्यानुसार विहित पध्दतीने शुल्क आकारण्यात येईल.

१.२.६.२ यशस्वीरित्या अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खालील पर्याय उपलब्ध असतील:-

(एक) ऑनलाईन पेमेंट:-

(१) क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड/नेटबँकिंग इत्यादीच्या सहाय्याने ऑनलाईन शुल्क भरता येईल.

(२)ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला आहे किंवा कसे याची स्थिती (Status) अवगत होईल. परीक्षा शुल्काचा भरणा केल्याच्या स्थितीची संबंधित जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करुन खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

(३) ऑनलाईन पध्दतीने शुल्काचा भरणा करताना उमेदवाराच्या खात्यामधून रकमेच्या कपातीनंतर आयोगाच्या खात्यावर रक्कम जमा होऊन व्यवहार (Transaction)यशस्वीपणे पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(४) उमेदवाराच्या खात्यामधून रक्कम कपात होऊनही अथवा उमेदवारास रक्कम कपात झाल्याचा लघुसंदेश प्राप्त होऊनही कोणत्याही कारणास्तव आयोगास रक्कम प्राप्त झाली नाही अथवा व्यवहार अयशस्वी ठरल्यास, यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

(दोन) ऑफलाईन पेमेंट (चलन) :-

(१) प्रस्तुत पर्याय निवडल्यानंतर उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(२) चलनाची प्रत उपलब्ध झाल्यानंतर किमान तीन तासांनी अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणा करता येईल.

(३) चलनाद्वारे शुल्क भरावयाचे झाल्यास चलन घेण्याबाबतची कार्यवाही संबंधित जाहिरातीस अनुसरुन चलन प्राप्त करुन घेण्याकरीता विहित केलेल्या दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे.

१.२.६.३ जाहिरात/अधिसूचनेमध्ये नमूद अंतिम दिनांकापर्यंत उमेदवाराने शुल्क भरणा न केल्यास त्याचा अर्ज ग्राह्य मानण्यात येणार नाही व या संदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१.२.६.४ विहित पध्दतीने परीक्षा शुल्काचा यशस्वीपणे भरणा केल्यानंतर व तो आयोगास प्राप्त झाल्यानंतर संबंधित पदभरतीकरीता अर्ज संकेतांक उमेदवाराला त्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर व ईमेल आयडीवर प्राप्त न झाल्यास संबंधित पदभरतीसाठी आयोगास अर्ज सादर झाला नसल्याची शक्यता आहे. अशावेळी उमेदवाराने स्वत:च्या प्रोफाईलमधून विहित शुल्कासह अर्ज सादर झाला असल्याची विहित दिनांकापूर्वी स्वत: खात्री करावी.

१.२.६.५ आयोगास प्राप्त झालेल्या परीक्षा शुल्काचा कोणत्याही कारणास्तव परतावा करण्यात येणार नाही; तसेच यासंदर्भातील अभिवेदनांचा विचार केला जाणार नाही.

### १.२.७ जिल्हाकेंद्र निवड (लागू असल्यास):-

(१) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर - उमेदवाराला उपलब्ध पर्यायातून जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

(२) संबंधित परीक्षेकरीता प्रत्येक जिल्हाकेंद्रांची उमेदवार सामावून घेण्याची क्षमता निश्चित असून ज्या जिल्हाकेंद्राची क्षमता पूर्ण होईल. ते जिल्हाकेंद्र उमेदवारास निवडता येणार नाही. उमेदवारास उपलब्ध पर्यायातून नजीकच्या/सोईच्या जिल्हाकेंद्रांची निवड करावी लागेल.

(४) विशिष्ट शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभवाच्या आधारे आयोजित सरळसेवा भरतीकरीता अर्ज करताना परीक्षा जिल्हाकेंद्र निवडीचा पर्याय उपलब्ध नसेल, तथापि, चाळणी परीक्षा घेण्याचा निर्णय झाल्यास आयोगाच्या त्या त्या वेळच्या धोरणानुसार व

उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या स्थायी/कायमस्वरुपी रहिवासाचा पत्ता विचारात घेऊन परीक्षेचे ठिकाण निश्चित करण्यात येईल. अशावेळी उमेदवारास आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या संबंधित परीक्षा उपकेंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित रहावे लागेल.

(५) उमेदवाराने निवड केलेल्या अथवा विहित मुदतीत उमेदवाराने निवड न केल्यामुळे आयोगाने उमेदवारास प्रवेश दिलेल्या परीक्षा जिल्हाकेंद्रामध्ये बदल करण्याबाबत उमेदवाराचा विनंती अर्ज/अभिवेदन विचारात घेतले जाणार नाही.

(६) आयोगाने उमेदवारास ज्या जिल्हाकेंद्रावरील परीक्षा उपकेंद्रावर प्रवेश दिला असेल त्याच ठिकाणी उमेदवारास उपस्थित राहणे अनिवार्य असेल.

### १.२.८ अर्ज रद्द करण्याबाबत:-

(१) अर्ज सादर केल्यानंतर अर्जामध्ये चुकीचा दावा केला असल्याचे उमेदवाराच्या निदर्शनास आल्यास अथवा कोणताही दावा बदलायचा असल्यास अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी विहित शुल्काचा भरणा केल्यानंतर अर्ज रद्द करुन आवश्यक सुधारणांसह नव्याने अर्ज करता येईल.

(२) उमेदवाराने एखाद्या पदभरतीसाठी सादर केलेला अर्ज परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी रद्द करता येईल.

(३) एखादा अर्ज रद्द करुन पुन्हा नवीन अर्ज करण्याकरीता विहित परीक्षा शुल्काचा पुनर्भरणा करणे आवश्यक राहील.

(४) एकदा रद्द करण्यात आलेला अर्ज कोणत्याही परिस्थितीत पुनरुज्जीवित करता येणार नाही. तसेच, परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

(५) आयोगास सादर केलेला अर्ज रद्द करुन पुन्हा नव्याने अर्ज सादर करण्याची व परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही आयोगाने संबंधित परीक्षेसाठी विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) विहित पध्दतीने व विहित कालावधीमध्ये अर्ज रद्द करण्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. अशा प्रकरणी आयोगाकडे करण्यात आलेल्या कोणत्याही तक्रारीची / विनंतीची दखल घेतली जाणार नाही.

## १.३ उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध सोयी-सुविधा:-

(एक) प्रोफाईल पाहणे / छापणे

(दोन) प्रोफाईल अद्ययावत करणे

(तीन) "माझे ॲप्लिकेशन" द्वारे उमेदवारास त्याने अर्ज सादर केलेल्या पदभरती संदर्भात खालील सुविधा उपलब्ध असतील:-

(१) पहा:- सादर केलेला अर्ज पाहता येईल.

(२) प्रवेशपत्र:- संबंधित परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र डाऊनलोड करता येईल.

(३) निकाल:- गुणपत्रिका पाहता येईल.

(४) मुलाखत:- संबंधित भरती प्रक्रियेस मुलाखत घेण्यात येत असल्यास व मुलाखतीकरीता पात्र ठरल्यास मुलाखतपत्र डाऊनलोड करता येईल.

(५) पावती:- ऑनलाईन शुल्क भरणा केल्याची पावती पाहता येईल.

(६) जिल्हाकेंद्र निवडा:- परीक्षेसाठी जिल्हाकेंद्र निवडीचा पर्याय असल्यास अर्जासोबत पसंतीचे जिल्हाकेंद्र निवडता येईल.

(७) फेरमोजणी:- निकालानंतर विहित कालमर्यादेत केवळ मुख्य परीक्षेच्या गुणांच्या फेरमोजणीसाठी अर्ज करता येईल.

(८) प्राधान्यक्रम:- बहुसंवर्गीय पदभरतीकरीता संवर्गाचा/पदांचा प्राधान्यक्रम निवडता येईल.

(९) अर्ज रद्द करा:- संबंधित भरतीप्रक्रियेकरीता सादर केलेला अर्ज रद्द करता येईल.

(१०) शारीरिक चाचणी:- संबंधित भरतीप्रक्रियेकरीता शारीरिक चाचणी घेण्यात येत असल्यास त्यासाठी पात्र ठरल्यास शारिरीक चाचणीसाठीचे पत्र पाहता/डाऊनलोड करता येईल.

(११) शिफारस पत्र:- संबंधित भरतीप्रक्रियेच्या अंतिम निकालाद्वारे उमेदवाराची निवड झाली असल्यास आयोगाचे शिफारसपत्र अंतिम निकालानंतर काही दिवसात पाहता / डाऊनलोड करता येईल.

(१२) प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करता येतील.

(१३) वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी उत्तरपत्रिकेची स्कॅन प्रत

(१४) आयोगाकडून करण्यात येणारा पत्रव्यवहार.

(१५) भरतीप्रक्रियेतून बाःएर पडण्याचा विकल्प सादर करता येईल.

## १.४ अर्जामधील दाव्यांसंदर्भात सूचना:

**१.४.१** अर्जाद्वारे आयोगाकडे विविध प्रकारचा दावा करताना शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले सुधारित शासन निर्णय, शासन परिपत्रक व आदेश लक्षात घेणे आवश्यक राहील. त्यासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील.

**१.४.२** अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे उमेदवारास लेखी परीक्षा / मुलाखत / शारीरिक चाचणी / प्रमाणपत्र पडताळणीसाठी तात्पुरते पात्र समजण्यात येईल. मुलाखत / शारीरिक चाचणी / शिफारशीच्या / नियुक्तीच्या अगोदर कोणत्याही टप्प्यावर अर्जामध्ये दिलेली पात्रतेविषयक माहिती मूळ कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्यात येईल व त्याच्या आधारे पात्र आढळून आल्यानंतरच उमेदवारास पुढील संधी देण्यात येईल.

**१.४.३** अर्जामधील सर्व माहितीची अथवा दाव्यांची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा पुरावा आयोगाच्या सूचनेनुसार कोणत्याही टप्प्यावर सादर करणे आवश्यक राहील. परीक्षेपूर्वी, परीक्षेनंतर, मुलाखतीपूर्वी अथवा त्यानंतर अन्य कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

१.४.४ उमेदवाराने अर्जात केलेले दावे कोणत्याही कारणास्तव बदलून देण्यात येणार नाहीत. तसेच उमेदवाराने अर्जात चुकीचा दावा केला असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आल्यास सदर दावा रद्द करण्यात येईल व उमेदवारास सदर दाव्याच्या किंवा त्याच्याकडे असलेल्या प्रमाणपत्रानुसारच्या दाव्याच्या अनुषंगाने कोणतेही लाभ अनुज्ञेय करण्यात येणार नाहीत.

## १.५ आयोगाशी पत्रव्यवहार/संपर्क:-

१.५.१ आयोगाशी करावयाचा कोणताही पत्रव्यवहार खालील पत्ता व/अथवा ईमेल आयडीवर करण्यात यावा:-

(एक) पत्ता:-

**सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५१/२, ७, ८ वा मजला, महानगर टेलिफोन एक्सचेंज बिल्डींग, महर्षी कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१**

(दोन) contact-secretary@mpsc.gov.in

१.५.२ आयोगाचे मा. अध्यक्ष अथवा आयोगाच्या मा. सदस्यांच्या नावाने अथवा पदनामाने पत्रव्यवहार करण्यात येऊ नये.

१.५.३ आयोगाशी पत्रव्यवहार करताना उमेदवाराने त्याच्या अर्जाविषयीचा पुढील तपशील नमूद करणे आवश्यक आहे:-

(एक) संवर्ग अथवा परीक्षेचे नाव

(दोन) अर्ज क्रमांक

(तीन) उमेदवाराचे नाव

(चार) बैठक क्रमांक/मुलाखत क्रमांक/शारीरिक चाचणी क्रमांक

१.५.४ उमेदवारांना आयोगाशी ईमेलद्वारे पत्रव्यवहार करावयाचा असल्यास त्यांनी त्यांच्या आयोगाकडील नोंदणीकृत ईमेल आयडीवरुन करावा. इतर कोणत्याही उमेदवाराच्या अथवा त्रयस्थ ईमेल आयडीवरुन केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

१.५.५ विशिष्ट प्रसंगी आयोगाच्या कार्यालयाने उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे/प्रमाणपत्रे विशिष्ट ईमेल आयडीवर सादर करण्यासंदर्भात प्रसिध्दीपत्रक अथवा पत्राद्वारे अथवा लघुसंदेशाद्वारे सूचना केली असल्यास उमेदवारांनी सदर ईमेल आयडीवरच पत्रव्यवहार करावा.

१.५.६ संबंधित भरतीकरीता उमेदवाराने केवळ स्वत:च्या अर्जाच्या अनुषंगाने केलेला पत्रव्यवहार विचारात घेण्यात येईल. याव्यतिरिक्त, एखाद्या प्रकरणाच्या अनुषंगाने मागितलेला खुलासा, अभिप्राय, माहिती, इत्यादी संबंधातील पत्रव्यवहार अथवा आयोगाच्या कामाजाशी संबंधित नसलेला पत्रव्यवहार अथवा ज्या बाबीसंदर्भातील पत्रव्यवहाराची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही, अशा प्रस्तुत सर्वसाधारण सूचनांमध्ये नमूद करण्यात आलेल्या बाबी इत्यादी संदर्भातील पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. असा पत्रव्यवहार परस्पर दफ्तरी दाखल करण्यात येईल.

**प्रकरण क्रमांक-दोन**

# पात्रता / अर्हता, वयोमर्यादा, अनुभव, अपात्रता इत्यादी

## २.१ सर्वसाधारण पात्रता:-

२.१.१ भारताचा नागरिक

२.१.२ किमान अर्हता:-

(१) अर्ज करणा-या सर्व उमेदवारांनी जाहिरातीमधील/अधिसूचनेतील सर्व तरतुदी व अटींची पूर्तता करणे आवश्यक असून याबाबत स्वत:च खातरजमा करणे इष्ट होईल.

(२) शैक्षणिक अर्हता अथवा अनुभव अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाच्या पात्रतेबाबत केलेल्या कोणत्याही चौकशीची दखल घेण्यात येणार नाही अथवा पात्रतेसंदर्भात आयोगाच्या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन करण्यात येत नाही.

(३) आयोगाकडून प्रवेश प्रमाणपत्र / मुलाखत पत्र/शारीरिक चाचणी/प्रमाणपत्र पडताळणीसाठी पत्र पाठविण्यात आले, याचा अर्थ आयोगाने उमेदवारी अंतिमत: पक्की केली, असा होत नाही.

## २.२ अर्हता व अर्हता धारण केल्याचा दिनांक:-

### २.२.१ अर्हता:-

(१) संबंधित पदभरतीच्या जाहिरातीमध्ये/अधिसूचनेमध्ये नमूद केल्यानुसार विहित शैक्षणिक अर्हता/अनुभव/पात्रता धारण करणे आवश्यक राहील.

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या विद्यापीठ / अभिमत विद्यापीठ (Deemed University) अथवा विद्यापीठ अनुदान आयोग अथवा AICTE ने मान्यता दिलेल्या स्वायत्त संस्थांमधील शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक -आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/२०११/१३, दिनांक २३ ऑगस्ट, २०११ मधील आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वायत संस्था इत्यादीच्या विविध पदविका, पदवी व पदव्युत्तर पदव्यांना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास (शिक्षण) मंत्रालयाकडून केंद्र शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी वेळोवेळी प्रदान केलेली व भविष्यात प्रदान केली जाणारी समकक्षता राज्य शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

(४) स्वायत्त संस्थांचे कोर्स हे भारतातील विद्यापीठ संघाने मान्यता दिलेल्या कोर्सशी समकक्ष असणे आवश्यक आहे.

(५) सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना संबंधित केंद्रिय मान्यता मंडळाची (AICTE, MCI, PCI, BCI, NCTE, etc) त्या त्या संस्थेत / महाविद्यालयात / विद्यापीठात अभ्यासक्रम चालविण्याची मान्यता असणे आवश्यक आहे.

(६) संशोधनाच्या पदव्यांना त्या त्या विद्यापीठात / अभिमत विद्यापीठात / स्वायत्त संस्थेत असे संशोधन अभ्यासक्रम चालविण्याची विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता असणे आवश्यक आहे.

(७) अभियांत्रिकी तसेच तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांची समकक्षता शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/८४५/१३/भाग-१/तंशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ आणि तदनंतर शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार राहील.

(८) संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये तरतूद असल्यासच महाराष्ट्र शासनाने समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून मान्य केलेल्या पदवी /पदविका स्वीकारार्ह असतील.

(९) जाहिरात/ अधिसूचनेमधील विहित दिनांकानंतर धारण केलेली शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव विशिष्टपणे जाहिरातीमध्ये तरतूद असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरली जाणार नाही. तसेच, यासंदर्भात कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

### २.२.२ अनुभव :

(१) मुंबई नागरी सेवा (वर्गीकरण व सेवाभरती) नियम, १९३९ मधील तरतुदीनुसार अनुभवाची गणना करण्यात येईल.

(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीआर-१०७९/११६०-XII, दिनांक १८ जुलै, १९७९ नुसार पदासाठी आवश्यक असणारा अनुभव हा (विशिष्टपणे नमूद केलेला नसल्यास) पदाची विहित शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतरचाच असणे आवश्यक आहे.

(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - एसआरव्ही -२००४ /प्र.क्र.१०/०४/१२, दिनांक ३ जुलै, २००४ नुसार शासन सेवेतील निरनिराळ्या पदांवर सरळसेवेने / नामनिर्देशनाने सेवाभरती करण्याकरिता सेवा प्रवेश नियमानुसार विहित अनुभवाच्या कालावधीची गणना करताना रोजंदारी, कार्यव्ययी, करारपद्धती, मानधन, इत्यादी स्वरूपात केवळ पूर्णवेळ काम केले असल्यासच असा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

(४) तासिका (On hourly basis), नियतकालिक (Periodical), अंशकालीन (Part time), विद्यावेतनी (On Stipend), अभ्यागत (Visiting), अंशदानात्मक (Contributory), विनावेतनी (Without pay) तत्त्वावरील अंशकालीन सेवेचा कालावधी, प्रभारी (in-charge) म्हणून नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा (Additional Charge) कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

(५) अनुभव प्रमाणपत्र आयोगाकडून विहित करण्यात आलेल्या नमुन्यातच असणे अनिवार्य आहे.

(६) अनुभवाबाबत अन्य कागदपत्रे जसे की, ओळखपत्र, नियुक्ती पत्र, वेतनचिठ्ठी (pay slip) इत्यादी कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य समजण्यात येणार नाही.

(७) विहित/आवश्यक अनुभव जाहिरात / अधिसूचनेतील तरतुदीनुसार संबंधित क्षेत्रातील असणे अनिवार्य आहे.

(८) अध्यापकीय संवर्गातील पदभरतीकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी अध्यापनाचा (Teaching) दावा केलेल्या अनुभवाच्या कालावधीच्या नियुक्तीस संबंधित विद्यापीठ, तंत्रशिक्षण मंडळ, अथवा सक्षम अधिकारी (लागू असेल त्याप्रमाणे) मान्यता असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**२.२.३ अर्हता धारण केल्याचा दिनांक:-**

(१) विहित शैक्षणिक अर्हता / अनुभव / पात्रताविषयक अर्हता धारण केल्याच्या दिनांकासंदर्भात संबंधित परीक्षेच्या जाहिरात/अधिसूचनेव्दारे विहित केलेला अर्हतेचा दिनांक अंतिम मानण्यात येईल.

(२) स्पर्धा परीक्षेद्वारे राबविण्यात येणा-या पदभरतीकरीता पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षास बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी तात्पुरत्या स्वरुपात पात्र असतील. तथापि, पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांनी मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त करणे/पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

(३) आंतर्वासिता (Internship) किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव (Apprenticeship) निर्धारित केला असेल अशी पदवी/पदविका धारण करणा-या उमेदवाराने अंतर्वासिता किंवा अनुभव संबंधित जाहिरात/अधिसूचनेनुसार अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी धारण करणे आवश्यक आहे.

## २.३ वयोमर्यादा:-

**२.३.१** वयोमर्यादेची गणना महाराष्ट्र नागरी सेवा (नामनिर्देशनाने भरतीसाठी उच्च वयोमर्यादेची तरतूद) नियम, १९८६ अथवा यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशांमधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

**२.३.२** संबंधित पदाच्या जाहिरातीमध्ये / अधिसूचनेमध्ये नमूद केल्यानुसार विहित वयोमर्यादा धारण करणे आवश्यक राहील.

**२.३.३** सर्वसाधारणपणे आयोगाच्या कक्षेतील पदांकरीता विविध संवर्गातील उमेदवारांच्या कमाल वयोमर्यादा पुढील प्रमाणे आहे:-

| प्रवर्ग | समांतर आरक्षण | | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| अराखीव | सर्वसाधारण | | ३८ वर्षे |
| | महिला | | ३८ वर्षे |
| | खेळाडू | | ४३ वर्षे |
| | माजी सैनिक | सरळसेवा भरती व गट-क संवर्गातील पदांकरीताच्या स्पर्धा परीक्षा | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे |
| | | गट-अ व गट-ब संवर्गातील पदांकरीताच्या स्पर्धा परीक्षा | ४३ वर्षे |
| | | दिव्यांग माजी सैनिक | ४५ वर्षे |
| | दिव्यांग | | ४५ वर्षे |
| | अनाथ | | ४३ वर्षे |
| | प्रकल्पग्रस्त | | ४५ वर्षे |
| | भूकंपग्रस्त | | ४५ वर्षे |
| | पदवीधर अंशकालीन कर्मचारी | | ५५ वर्षे |
| अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती/ निरधिसुचित जमाती (विमुक्त जाती-अ) / भटक्या जमाती-ब / भटक्या जमाती-क / भटक्या जमाती-ड / विशेष मागास प्रवर्ग / इतर मागास वर्ग / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | सर्वसाधारण | | ४३ वर्षे |
| | महिला | | ४३ वर्षे |
| | खेळाडू | | ४३ वर्षे |
| | माजी सैनिक | सरळसेवा भरती व गट-क संवर्गातील पदांकरीताच्या स्पर्धा परीक्षा | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे |
| | | गट-अ व गट-ब संवर्गातील पदांकरीताच्या स्पर्धा परीक्षा | ४३ वर्षे |
| | | दिव्यांग माजी सैनिक | ४५ वर्षे |
| | प्रकल्पग्रस्त | | ४५ वर्षे |
| | भूकंपग्रस्त | | ४५ वर्षे |
| | पदवीधर अंशकालीन कर्मचारी | | ५५ वर्षे |
| | दिव्यांग | | ४५ वर्षे |
| | अनाथ | | ४३ वर्षे |

२.३.४ विशिष्ठ शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभवाच्या आधारे आयोजित सरळसेवा भरतीकरीता तसेच काही विभागासाठी आयोजित मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेकरीता संबंधित जाहिरात/शासन परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे वयोमर्यादा धारण करणे अनिवार्य राहील.

२.३.५ विहित वयोमर्यादेमधील शिथिलता/सूट:-

**(१)** राष्ट्रीय छात्रसेनेत पूर्णकालिक छात्र निदेशक म्हणून भरती करण्यात आलेल्या आणि ज्यांना सेवेतून मुक्त करण्यात आलेले आहे, अशा उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे वय विहित वयोमर्यादेत यावे म्हणून त्यांनी राष्ट्रीय छात्रसेनेत व्यतीत केलेला सेवा कालावधी हा प्रत्यक्ष वयामधून वजा करण्यात येईल. मात्र त्यांनी सेवेतून मुक्त होण्यापूर्वी किमान सहा महिने तरी सेवा बजावली असली पाहिजे.

**(२)** प्रादेशिक सेना युनिटच्या कायम कर्मचारीवर्गामध्ये सेवा बजावणा-या किंवा प्रादेशिक सेना नियम ३३ अन्वये किमान पाच वर्षांहून कमी नसेल इतक्या सलग कालावधीसाठी सेवेमध्ये समाविष्ट करून घेण्यात आलेले असेल अशा प्रादेशिक सेनेतून मुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांना त्यांचे वय विहित वयोमर्यादेच्या आत यावे. म्हणून त्यांच्या प्रादेशिक सेनेतील सेवेचा कालावधी अधिक दोन वर्षे त्यांच्या प्रत्यक्ष वयामधून वजा करण्याची परवानगी देण्यात येईल.

**(३)** अनुसूचित जाती (बौद्ध धर्मांतरितांसह), अनुसूचित जमाती, तसेच समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गातील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांना विहित कमाल वयोमर्यादा पाच वर्षांनी शिथिलक्षम असेल.

**(४)** माजी सैनिक, पात्र दिव्यांग व्यक्ती, प्राविण्यप्राप्त खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर अंशकालीन कर्मचारी इत्यादींना शासनाच्या संबंधित नियमानुसार वयोमर्यादेतील सवलत अनुज्ञेय राहील.

**(५)** एखाद्या उमेदवार वयोमर्यादेतील सवलतीपैकी एकापेक्षा जास्त सवलतीकरीता पात्र ठरत असल्यास पात्र सवलतींपैकी अधिकतम सवलत अनुज्ञेय राहील.

**(६)** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पात्र कर्मचा-यांना जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदीनुसार प्रकरणपरत्वे वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**(७)** बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (बेस्ट) च्या सेवेतील कर्मचा-यांना बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (बेस्ट)च्या भरतीकरिता संबंधित जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदीनुसार वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**(८)** स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, महानगरपालिका, नगरपालिका / नगरपरिषद, नगरपंचायत, छावणी मंडळ, इत्यादी), शासनाची महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, विद्यापीठे, शासन अनुदानित शाळा/महाविद्यालये इत्यादीच्या सेवेतील कर्मचा-यांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांसाठी अनुज्ञेय असलेली वयोमर्यादेतील सूट अनुज्ञेय राहणार नाही.

## २.४ लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन :-

(१) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५, मधील तरतुदींनुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल.

(२) या नियमातील व्याख्येनुसार लहान कुटुंब याचा अर्थ, दोन अपत्ये यांसह पत्नी व पती असा आहे.

## २.५ संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान:-

महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम १९९९ मधील तरतुदीनुसार शासनाने वेळोवेळी आवश्यक ठरविलेली संगणक अर्हता धारण करणे अनिवार्य राहील.

## २.६ निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया:-

### २.६.१ किमान अर्हता:-

**२.६.१.१** अर्जामध्ये केलेल्या विविध प्रकारच्या दाव्यांस अनुसरुन उमेदवार पदाच्या विहित अर्हतेबाबतच्या सर्व अटींची पूर्तता करीत आहे, असे गृहित धरुन तसेच सदर बाब मुलाखतीच्या वेळी मूळ प्रमाणपत्राच्या आधारे तपासण्याच्या अटींच्या अधीन राहून उमेदवारास केवळ तात्पुरत्या स्वरूपात परीक्षेस प्रवेश देण्यात येईल अथवा मुलाखतीस बोलाविण्यात येईल.

**२.६.१.२** केवळ आयोगाकडून लेखी परीक्षेकरिता प्रवेशपत्र पाठविण्यात आले अथवा मुलाखतपत्र पाठविण्यात आले म्हणून आयोगाने संबंधिताची उमेदवारी अंतिमत: पक्की केली, असा अर्थ होत नाही.

**२.६.१.३** विहित अर्हता किमान आवश्यक अर्हता असून ती धारण करणा-या सर्वच उमेदवारांना लेखी परीक्षा, शारीरिक चाचणी अथवा मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल, असे नाही.

**२.६.१.४** अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी पर्याप्त उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल, त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिली करण्याकरीता विचारात घेतला जाईल.

**२.६.२ अर्जाची छाननी:-**

**२.६.२.१** जाहिरातीतील/अधिसूचनेतील तरतुदीनुसार केवळ किमान विहित अर्हता धारण करणा-या उमेदवारांना परीक्षा/मुलाख़त/शारीरिक चाचणी/प्रमाणपत्र पडताळणीसाठी बोलाविण्याचा कोणताही हक्क असणार नाही.

**२.६.२.२** परीक्षा/मुलाखत/शारीरिक चाचणी/प्रमाणपत्र पडताळणीसाठी बोलाविण्याकरिता उमेदवार योग्य आहे किंवा नाही, याची आयोगाच्या धोरणानुसार तात्पुरत्या स्वरुपात तपासणी करून पात्रता आजमावल्यानंतर योग्य असल्याचे आढळून येणा-या उमेदवारांनाच पुढील टप्प्यावरील कार्यवाहीसाठी बोलाविण्यात येईल.

**२.६.२.३** उमेदवारांना परीक्षा / मुलाखत / शारीरिक चाचणी / प्रमाणपत्र पडताळणीसाठी दिलेला प्रवेश हा ते पदाच्या विहित अर्हतेबाबतच्या सर्व अटी व शर्ती तसेच निकषांची पूर्तता करतात, या अधीनतेने केवळ तात्पुरत्या स्वरूपाचा असेल.

**२.६.२.४** अर्जाद्वारे सादर केलेल्या विविध दाव्यांच्या/माहितीच्या आधारेच पात्रता अजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

**२.६.२.५** छाननी प्रक्रिया (फक्त सरळसेवा भरतीसाठी लागू)

**(एक)** भरावयाच्या एकूण पदसंख्येस अनुसरुन मुलाखतीस बोलाविण्यात येणा-या उमेदवारांची संख्या आयोगाच्या कार्यनियमावलीच्या अथवा त्यानंतर वेळोवेळी आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या धोरणाच्या/आदेशाच्या आधारे निश्चित करण्यात येईल.

**(दोन)** आयोगाच्या प्रचलित धोरणानुसार मुलाखतीकरिता खालीलपैकी एक अथवा एकापेक्षा जास्त प्रकारे अथवा प्रकरणाच्या परिस्थितीनुरुप आवश्यक ठरेल अशा अन्य कोणत्याही प्रकारे उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल:-

(१) जाहिरातीमध्ये विहित केलेल्या किमान अर्हतेपेक्षा उच्च अर्हता व अनुभवाच्या आधारे किंवा

(२) जाहिरातीमध्ये विहित केलेल्या किमान अर्हतेपेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता

(३) संबंधित क्षेत्रातील अनुभव किंवा

(४) जाहिरातीमध्ये विहित केलेल्या प्राधान्यशील अर्हता व अपवादात्मक अर्हता किंवा

(५) किमान आवश्यक अर्हतेनंतर/अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे विहित अर्हतेनंतर धारण केलेल्या अनुभवाची गणना करून किंवा

(६) चाळणी परीक्षेद्वारे

**(तीन) जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची संख्या आयोगाच्या कार्यनियमावलीमध्ये विहित करण्यात आलेल्या प्रमाणापेक्षा जास्त असेल तर खालील निकषांच्या आधारे मुलाखतीकरीता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल**:-

(१) संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये प्राधान्यशील शैक्षणिक अर्हता अथवा प्राधान्यशील अनुभवाची तरतुद असेल तर प्राधान्यशील अर्हता किंवा प्राधान्यशील अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांना मुलाखतीकरीता संख्या निश्चित करताना प्राधान्य देण्यात येईल.

(२) किमान शैक्षणिक अर्हता असलेल्या व अनुभव आवश्यक नसलेल्या पदांच्या बाबतीत प्राधान्यशील अर्हतेनंतर संबंधित विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. उच्च शैक्षणिक अर्हता म्हणजे संबंधित शाखेतील किमान शैक्षणिक अर्हतेनंतर धारण केलेली त्याच शाखेतील उच्च शैक्षणिक अर्हता होय. उदा. एखाद्या शाखेतील पदवी ही जर किमान शैक्षणिक अर्हता असेल तर त्याच शाखेतील पदव्युत्तर पदवी ही पुढील उच्च शैक्षणिक अर्हता समजण्यात येईल. परंतु, संबंधित किमान पदवीनंतर धारण केलेली पदविका अथवा पदवी ही उच्च शैक्षणिक अर्हता समजण्यात येणार नाही.

(३) एम.फिल अथवा समकक्ष पदवी, पीएच. डी. अथवा तिच्याशी समकक्ष अर्हता म्हणुन सक्षम प्राधिका-याने मान्यता दिलेली इतर अर्हता पदव्युत्तर पदवी नंतरची चढत्याक्रमाने पुढील उच्च शैक्षणिक अर्हता समजण्यात येईल.

(४) पदवीसोबत शिक्षणशास्त्रातील पदवी यासारखी व्यावसायिक अर्हता निश्चित केली असल्यास अशी व्यावसायिक अर्हता मुलाखतीकरीता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी उच्च शैक्षणिक अर्हता म्हणून ग्राह्य धरण्यात येणार नाही. तरीदेखील उपरोक्त सर्व उच्च शैक्षणिक अर्हतांचा निकषासाठी उपयोग करुनही उमेदवारांची संख्या मर्यादीत होत नसेल तर किमान आवश्यक व्यावसायिक अर्हतेनंतर धारण केलेली उच्च व्यावसायिक अर्हता ही उच्च शैक्षणिक अर्हता समजण्यात येईल.

(५) संबंधित शाखेतील किमान शैक्षणिक अर्हतेव्यतिरिक्त अन्य अतिरिक्त पदवी, पदविका अथवा अन्य कोणतीही अर्हता यांना प्राधान्य देण्यात येणार नाही.

(६) आयोगाने मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी विहित केलेल्या प्रमाणात उमेदवार उपलब्ध होईपर्यंत वरील प्राधान्यक्रम अनुक्रमाने विचारात घेण्यात येईल.

**(७)** किमान शैक्षणिक अर्हता व किमान अनुभव विहित केलेल्या पदांच्या बाबतीत मुलाखतीकरीता संख्या निश्चित करण्यासाठी प्राधान्यशील अर्हतेनंतर कमाल अनुभवाचा कालावधी प्रथम विचारात घेण्यात येईल. तरीही मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित न झाल्यास उच्च शैक्षणिक अर्हतेचा विचार करण्यात येईल.

**(८)** वरील सर्व प्राधान्यक्रमांचा उपयोग करुनही उमेदवारांची संख्या मर्यादित करणे शक्य होत नसेल तर अशा परिस्थितीत किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये अनुक्रमे उच्च वर्ग, श्रेणी अथवा टक्के धारण करणाऱ्या उमेदवारांचा विचार करण्यात येईल. या पद्धतीद्वारे सुद्धा उमेदवारांची संख्या मर्यादीत होत नसेल तर उच्च शैक्षणिक अर्हतेमधील वर्ग, श्रेणी अथवा टक्के विचारात घेण्यात येतील.

(९) मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी उपरोक्त निकष लागू करणे शक्य होणार नाही इतक्या मोठ्या प्रमाणात उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास, आयोग चाळणी परीक्षा घेण्याबाबत विचार करेल. चाळणी परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे मुलाखतीसाठी विहीत प्रमाणात उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

(१०) सरळसेवा पध्दतीने (विशिष्ट शैक्षणिक अर्हता आणि/अनुभवाच्या आधारे) भरतीप्रक्रिया राबविण्यात येणा-या राजपत्रित गट-ब संवर्गातील पदभरतीकरीता मुलाखतीबरोबरच चाळणी परीक्षा घेण्यात येऊन निवडप्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

**(चार)** उपरोक्त पध्दतीने निकष विहित केल्यानंतर त्या निकषानुसार किमान अर्हता धारण करणा-या उमेदवारांनाच परीक्षेसाठी/ मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**२.६.२.६ चाळणी परीक्षा** (फक्त सरळसेवा भरतीसाठी लागू)

**(एक)** चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यानंतर चाळणी परीक्षेची परीक्षा योजना, प्रकार, अभ्यासक्रम, प्रश्नसंख्या, परीक्षेचा कालावधी, गुणदानाची पध्दत, परीक्षेचा दिनांक, परीक्षेचे ठिकाण इत्यादी बाबी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**(दोन)** चाळणी परीक्षा वस्तुनिष्ठ, पारंपरिक अथवा वस्तुनिष्ठ व पारंपरिक स्वरुपाची असू शकेल.

**(तीन)** चाळणी परीक्षा ऑफलाईन पध्दतीने किंवा ऑनलाईन पध्दतीने घेतली जाऊ शकते.

**(चार)** किमान प्रवेश पातळीवरील (Lowest feeder/ Entry Level) अथवा कोणतीही विशेष अर्हता विहित न केलेल्या अथवा कोणताही अनुभव विहित न केलेल्या पद / संवर्गातील नियुक्तीकरीता चाळणी परीक्षा घेण्यात येत असेल तर चाळणी परीक्षेतील गुण फक्त मुलाखतीकरीता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याकरीताच विचारात घेण्यात येतील.

**(पाच)** वर नमूद केलेली पदे सोडून इतर कोणत्याही पदाकरीता चाळणी परीक्षा घेण्यात येत असेल तर चाळणी परीक्षेतील गुण अंतिम निवडीकरीता विचारात घेण्यात येतील. अशावेळी मुलाख़तीचे गुण चाळणी परीक्षेच्या एकूण गुणांच्या २५% पेक्षा जास्त असणार नाहीत.

**(सहा)** वरीलपैकी कोणत्या प्रकारची चाळणी परीक्षा घ्यावयाची याविषयी आयोगाकडून प्रकरणपरत्वे निर्णय घेण्यात येईल; याविषयी परीक्षेपूर्वी निर्णय घेऊन प्रसिध्द केला जाईल.

**(सात)** चाळणी परीक्षा कोणत्या प्रकारात समाविष्ट आहे; याबाबत प्रश्न उद्भवल्यास आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

**(आठ)** चाळणी परीक्षा ही मुलाखतीकरीता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या उद्देशाने घेण्यात येत असल्यामुळे गुणांची फेरतपासणी करण्यात येत नाही.

## २.७ अपात्रता

२.७.१ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून कोणत्याही कारणास्तव प्रतिरोधित केलेल्या उमेदवारांना प्रतिरोधनाच्या कालावधीमध्ये कोणत्याही निवडप्रक्रियेकरीता अपात्र समजण्यात येईल.

२.७.२ संघ लोकसेवा आयोगाकडून कोणत्याही कारणास्तव प्रतिरोधित केलेल्या उमेदवारांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून तेवढ्याच कालावधीकरीता प्रतिरोधित करण्यात येईल.

२.७.३ अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास प्रतिरोधनाचा कालावधी गणण्यात येईल.

## २.८ उमेदवारी संदर्भातील बदल :-

२.८.१ उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी शासन अथवा आयोगाद्वारे कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता असते. सदर बदल आवश्यकतेनुसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबंधितांवर बंधनकारक असतील. असे बदल, प्रसिद्धी पत्रक इत्यादी सर्वसाधारणपणे आयोगाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील.

२.८.२ आयोगाने वेळोवेळी घेतलेले निर्णय संबंधितांवर बंधनकारक असतील.

२.८.३ अद्ययावत माहिती/सद्यस्थितीकरीता उमेदवाराने वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळाचे अवलोकन करणे, आवश्यक आहे.

## २.९ बायोमॅट्रिक पडताळणी :-

**२.९.१** निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराच्या बायोमॅट्रिक सत्यापनासाठी **(Genuineness)** डिजिटल स्वरुपात उमेदवारांच्या बोटांचे ठसे आणि/अथवा बुब्बुळाच्या आधारे पडताळणी केली जाईल.

२.९.२ बायोमॅट्रिक पडताळणीवेळी उमेदवार अस्सल नसल्याचे **(not genuine)** आढळून आल्यास त्याच्यावरील कायदेशीर कारवाईव्यतिरिक्त उमेदवारी रद्द होवू शकते, शिवाय आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधनाची कारवाई होवू शकते.

२.९.३ बायोमॅट्रिक पडताळणीकरीता अडचण निर्माण होवून प्रवेश नाकारला जावू नये, याची उमेदवाराने स्वत: दक्षता घेणे आवश्यक आहे. त्याकरीता उमेदवाराने हातावर मेहंदी, शाई, रसायन इत्यादी प्रकारची कोणतीही बाहयवस्तू/पदार्थ लावू नये.

२.९.४ उमेदवारांनी आधार तपशील त्यांच्या खात्यात नमूद केले असले तरी काही उमेदवारांनी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लॉक / अनलॉक सुविधेद्वारा त्यांची आधार क्रमांकाशी संलग्नित बायोमेट्रीक माहिती लॉक केली असल्यास आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) व पर्यायाने बायोमेट्रिक पडताळणी न होण्याची शक्यता आहे. आधार क्रमांकाच्या आधारे बायोमेट्रिक पडताळणी करण्याकरीता उमेदवारांची आधार संलग्नित बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) असणे आवश्यक आहे. यास्तव, आधार प्रमाणीकरणाकरीता बायोमेट्रिक माहिती लॉक केली असणा-या उमेदवारांनी परीक्षा / मुलाखत / शारिरीक चाचणीस उपस्थित राहण्यापूर्वी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock)करुन प्रमाणीकरणाकरीता खुली करावी.

**प्रकरण क्रमांक - तीन**

# आरक्षण व तदनुषंगिक तरतुदी

**३.१ आरक्षणाचे प्रकार:-**

राज्य शासनाच्या सेवेतील पदभरतीकरीता आरक्षणाचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत:-

३.१.१ उभे आरक्षण / सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण

३.१.२ आडवे आरक्षण / समांतर आरक्षण

**३.२ आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

**३.२.१** कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणा-या व त्याप्रमाणे अर्जात निरपवादपणे दावा करणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रनिधित्व कायदा, १९५० च्या कलम २० नुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

**३.२.२** महाराष्ट्राशिवाय इतर राज्यातील/देशातील उमेदवार तसेच महाराष्ट्र-कर्नाटक विवादित सीमा भागातील उमेदवार केवळ 'अराखीव-सर्वसाधारण' पदांवरील नेमणुकीसाठी पात्र असतील.

**३.२.३** अर्जामध्ये महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असल्याचा व आरक्षित प्रवर्गाचा (लागू असल्यास) स्पष्टपणे दावा केल्याशिवाय व प्रस्तुत दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक ती सर्व वैध कागदपत्रे / पुरावा सादर / अपलोड केल्याशिवाय संबंधित आरक्षित पदावरील निवडीकरीता उमेदवाराचा कोणत्याही परिस्थितीत विचार करण्यात येणार नाही.

**३.२.४** अर्जामध्ये कोणत्याही प्रकारच्या आरक्षणासंदर्भात केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक ती सर्व वैध कागदपत्रे सादर करु न शकलेल्या उमेदवाराचा केवळ 'अराखीव-सर्वसाधारण' पदांवरील निवडीकरीता विचार होऊ शकेल.

**३.३ उभे आरक्षण / सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण[२]:-**

३.३.१ सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांसाठीचे आरक्षण व सदर आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता संबंधित उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर करताना सादर/अपलोड करावयाची प्रमाणपत्रे यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | सामाजिक प्रवर्ग / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | संज्ञा | आरक्षणाचे प्रमाण/टक्केवारी | आवश्यक प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | अ.जा. | १३ % | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास) |
| २ | अनुसूचित जमाती | अ.ज. | ७% | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास) |
| ३ | निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती-अ) | नि.ज-अ / वि.जा.-अ | ३% | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र<br>(अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ४ | भटक्या जमाती-ब | भ.ज.-ब | २.५% | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र<br>(अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ५ | भटक्या जमाती-क | भ.ज.-क | ३.५% | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र<br>(अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ६ | भटक्या जमाती-ड | भ.ज.-ड | २% | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र<br>(अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | वि. मा. प्र. | २% | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र |

[२] महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, निरधिसुचित जाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष माग़ास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठीचे आरक्षण) अधिनियम २००१ तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | (अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ८ | इतर मागास वर्ग | इ.मा.व. | १९% | (१) जात प्रमाणपत्र<br>(२) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास)<br>(३) वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र<br>(अपवाद: माजी सैनिक, प्राविण्यप्राप्त खेळाडू) |
| ९ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | आ.दु.घ. | १०% | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठीचे प्रमाणपत्र (राज्य शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशाकरीताच्या प्रमाणपत्राचा मराठी भाषेतील नमुना) |

**३.३.२** विविध सामाजिक आरक्षणाचे उपरोक्त प्रमाण (टक्केवारी) एकूण मंजूर संवर्ग संख्येला लागू करण्यात येते व त्याच्या आधारे शासनाकडून आयोगास कळविण्यात येणा-या मागणीपत्राद्वारे प्राप्त झालेला पदनिहाय / आरक्षणनिहाय तपशील जाहिरातीमध्ये नमूद केला जातो.

**३.३.४ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणासंदर्भातील अटी[१] :-**

**(१)** राज्याच्या आर्थिक दुर्बल घटकातील ज्या व्यक्तींच्या जातींचा महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ अन्वये विहित करण्यात आलेल्या मागासवर्गासाठी अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार घोषित मागास वर्गीयामध्ये समावेश नसेल अशा उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय आहे.

**(२)** कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न शासनाकडून विहित करण्यात आलेल्या मर्यादेच्या आत (सद्यस्थितीत रुपये ८ लाख) असणा-या उमेदवारास आर्थिकदृष्ट्या दुर्बल समजण्यात येईल व सदर आरक्षणाच्या लाभासाठी तो पात्र असेल.

टीप:-(अ) प्रस्तुत आरक्षणाच्या प्रयोजनार्थ ‘कुटुंब’ म्हणजे उमेदवाराचे आई-वडील व १८ वर्षापेक्षा कमी वयाची भावंडे तसेच उमेदवाराची १८ वर्षापेक्षा कमी वयाची मुले व पती /पत्नी यांचा समावेश होईल.

(ब) प्रस्तुत आरक्षणाच्या प्रयोजनार्थ ‘कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न’ यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्यांच्या सर्व स्त्रोतामधून मिळणा-या उत्पन्नाचा समावेश असेल. म्हणजेच वेतन, कृषि उत्पन्न, उद्योग-व्यवसाय या व इतर सर्व मार्गातून होणारे व परीक्षेचा अर्ज दाखल करण्याच्या दिनांकाच्या मागील आर्थिक वर्षाचे वार्षिक उत्पन्न एकत्रितपणे शासनाकडून विहित करण्यात आलेल्या मर्यादेपेक्षा कमी असावे.

**(३)** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी संबंधित तहसीलदार यांनी वितरीत केलेले व राज्य शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशाकरीता राज्य शासनाचा प्रमाणपत्राचा नमुना वापरणे आवश्यक आहे. केंद्रीय सेवांचा लाभ घेण्यासाठीचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र, राज्य शासकीय सेवांसाठीच्या पदभरतीकरीता वापरता येणार नाही.[२]

## ३.४ विविध सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठींच्या आरक्षणासंदर्भातील अटी :-

३.४.१ महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

३.४.२ जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम-२००० मधील तरतुदी आणि यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी आदेश काढून विहित केलेल्या नमुन्यामध्ये सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

३.४.३ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांनी ते समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नाहीत, असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या वैध प्रमाणपत्राच्या प्रती सादर/अपलोड करणे आवश्यक आहे.

[१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९

[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक २८ जुलै, २०२०

३.४.४ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत ज्या व्यक्तींच्या नावे जातीचे प्रमाणपत्र असेल ती व्यक्ती व त्या व्यक्तीचे कुटुंब क्रिमी लेअरमध्ये मोडत नसल्याचे व धारकाच्या नावाने सर्वसाधारण रहिवास सदर प्रमाणपत्रात प्रमाणित असणे आवश्यक आहे.

३.४.६ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असलेल्या स्थलांतरित मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.[१]

३.४.७ उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणा-या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास प्रवर्गामधील उमेदवार मागासवर्गीयांसाठी असलेले वय, परीक्षा शुल्क अथवा अन्य कोणत्याही सवलतीस पात्र नाहीत.

३.४.८ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) विशेष मागास प्रवर्ग तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गाचा दावा करणा-या पात्र माजी सैनिक व प्राविण्यपात्र खेळाडू उमेदवारांना फक्त माजी सैनिक अथवा खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

## ३.५ समांतर आरक्षण :-

३.५.१ आयोगाच्या कार्यकक्षेतील पदांकरीता लागू असलेल्या समांतर आरक्षणाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

| पात्र व्यक्ती | आरक्षणाचे प्रमाण | लागू असलेले संवर्ग | समांतर आरक्षणाचा प्रकार |
|---|---|---|---|
| महिला | ३० % | गट-अ, गट-ब व गट-क | सामाजिक प्रवर्गांतर्गत कप्पीकृत |
| प्राविण्यप्राप्त खेळाडू | ५% | गट-अ, गट-ब, व गट-क | सामाजिक प्रवर्गांतर्गत कप्पीकृत |
| माजी सैनिक | १५% | गट-क | सामाजिक प्रवर्गांतर्गत कप्पीकृत |
| दिव्यांग (Persons with Benchmark Disabilities) | ४% | गट-अ, गट-ब व गट-क | एकूण समांतर आरक्षण- सामाजिक प्रवर्गांतर्गत कप्पीकृत नसलेले |
| अनाथ | १% | गट-अ, गट-ब, गट-क | एकूण समांतर आरक्षण- सामाजिक प्रवर्गांतर्गत कप्पीकृत नसलेले |
| प्रकल्पग्रस्त | ५% | गट-क | सामाजिक प्रवर्गांतर्गत कप्पीकृत |
| भूकंपग्रस्त | २% | गट-क | सामाजिक प्रवर्गांतर्गत कप्पीकृत |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | १०% | गट-क | सामाजिक प्रवर्गांतर्गत कप्पीकृत |

३.५.२ प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांच्याकरीताचे आरक्षण बृहन्मुंबई क्षेत्रातील शासकीय कार्यालयाव्यतिरिक्त अन्य शासकीय कार्यालयातील केवळ लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी लागू राहील.

### ३.५.३ अनुशेष :-

३.५.३.१ संबंधित निवडप्रक्रियेकरीता महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू[२], प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त[३] व पदवीधर अंशकालीन कर्मचारी[४] यांच्याकरीताच्या समांतर आरक्षणानुसार आरक्षित पदाकरीता सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदाचा अनुशेष पुढे ओढण्यात येत नाही. सदर पदे संबंधित सामाजिक प्रवर्गातील इतर उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

३.५.३.२ एखाद्या भरती वर्षात माजी सैनिक यांच्याकरीताच्या समांतर आरक्षणानुसार आरक्षित पदाकरीता सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांचा अनुशेष एक वर्षाच्या कालावधीकरीता पुढे ओढण्यात येईल, पुढील भरती वर्षातही अनुशेषाच्या पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही; तर सदर पदे संबंधित सामाजिक प्रवर्गातील इतर उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.[५]

३.५.३.३ एखाद्या भरती वर्षात विहित दिव्यांगत्व असलेली पात्र दिव्यांग व्यक्ती उपलब्ध झाली नाही तर त्या दिव्यांगाच्या प्रकारासाठी आरक्षित जागेचा अनुशेष पुढील भरती वर्षासाठी पुढे ओढण्यात येईल. पुढील भरती वर्षातही विशिष्ट दिव्यांग प्रकारासाठी आरक्षित असलेल्या व अनुशेषाच्या पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अन्य दिव्यांग प्रकारातून अंतर्गत परिवर्तनाने पद भरती

---

[१] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१०८५/२६३०४/[२१९९]/बीसीडब्ल्यू-५, दिनांक ६ ऑक्टोबर,१९८६

[२] शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६

[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक विकाक २२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दिनांक ४ नोव्हेंबर २०१६

[४] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, अंशका १९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ, दिनांक १९सप्टेंबर २०१३

[५] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:-आरटीए १०७९/०/४८२/१६-अ, दिनांक १६ एप्रिल, १९८१

करण्यात येते; अंतर्गत परिवर्तनानेही आरक्षित पद सदर भरतीप्रक्रियेमध्ये भरणे शक्य न झाल्यास, दिव्यांगाव्यतिरिक्त सर्वसाधारण उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार पद भरती करण्यात येते.[१]

३.५.३.४ एखाद्या भरती वर्षात पात्र अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर आरक्षित जागेचा अनुशेष पुढील भरती वर्षासाठी ओढण्यात येतो. जर पुढील भरती वर्षातही पात्र अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद अनाथांव्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येते[२].

३.५.४ समांतर आरक्षणाची अंमलबजावणी शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात येते.

### ३.५.५ महिलांसाठीचे आरक्षण[३] :-

३.५.५.१ महिलांसाठी समांतर आरक्षणाच्या अनुषंगाने शासनाकडून विशेष तरतुदी करण्यात आल्या असून महिलांना त्यांच्याशी संबंधित सामाजिक प्रवर्गाच्या तरतुदींव्यतिरिक्त सदरच्या तरतुदी या अतिरिक्त आहेत.

३.५.५.२ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अराखीव व इतर सामाजिक प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटातील महिलांना महिलांकरीताचे समांतर आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

३.५.५.३ वय, परीक्षा शुल्क:- महिला उमेदवारांना वय, परीक्षा शुल्क इत्यादी तरतुदी त्यांच्याशी संबंधित सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणेच राहतील.

३.५.५.४ वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र:-

(१) महिलांसाठी आरक्षित पदांवर दावा करणा-या/करणारा संबंधित उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असणे आवश्यक आहे.

(२) जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करताना अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचे सक्षम प्राधिका-याने वितरित केलेले वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र किंवा अधिवास प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

(३) पूर्व व मुख्य अशा दोन टप्प्यातील परीक्षांच्या बाबतीत पूर्व परीक्षेचा अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचे सदर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

३.५.५.५ जात प्रमाणपत्र:-

(१) मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित पदांवर दावा करणा-या उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याने वितरित केलेले व संबंधित पद भरतीकरीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी निर्गमित केलेले (दोन टप्प्यांतील परीक्षांच्या बाबतीत पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचे) जात प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

(२) मागासवर्गीय व्यक्तीशी आंतरजातीय विवाह केलेल्या उमेदवारांना त्यांच्या स्वत:च्या मूळ प्रवर्गानुसार सवलती देय असतील.

३.५.५.६ नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र:-

(एक) महिलांसाठी आरक्षित पदांवर दावा करणा-या उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याने वितरित केलेले व संबंधित पदभरतीकरीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास (दोन टप्प्यातील परीक्षांच्या बाबतीत पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचे) वैध असणारे नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

(दोन) नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी खालीलप्रमाणे विचारात घेण्यात येईल [४]:-

(१) उमेदवाराच्या कुटुंबाचे मागील तीन आर्थिक वर्षाचे उत्पन्न गृहित धरुन वितरित करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र वितरित केलेल्या दिनांकाच्या आर्थिक वर्षासह पुढील तीन आर्थिक वर्षाच्या कालावधीकरीता वैध राहिल. तथापि, प्रमाणपत्राच्या वैधतेचा अंतिम दिनांक प्रमाणपत्रावर नमूद असेल तोच ग्राह्य धरण्यात येईल.

(२) उमेदवाराच्या कुटुंबाचे मागील दोन आर्थिक वर्षाचे उत्पन्न गृहित धरुन वितरित करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र वितरित केलेल्या दिनांकाच्या आर्थिक वर्षासह पुढील दोन आर्थिक वर्षाच्या कालावधीकरीता वैध राहिल. तथापि, प्रमाणपत्राच्या वैधतेचा अंतिम दिनांक प्रमाणपत्रावर नमूद असेल तोच ग्राह्य धरण्यात येईल.

(३) उमेदवाराच्या कुटुंबाचे एका आर्थिक वर्षाचे उत्पन्न गृहित धरुन वितरित करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र वितरित केलेल्या दिनांकाच्या आर्थिक वर्षाकरीता वैध राहिल. तथापि, प्रमाणपत्राच्या वैधतेचा अंतिम दिनांक प्रमाणपत्रावर नमूद असेल तोच ग्राह्य धरण्यात येईल.

[१] दिव्यांग अधिकार अधिनियम २०१६

[२] शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३ ऑगस्ट २०२१

[३] शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१

[४] शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक १७ ऑगस्ट, २०१३

(तीन) अमागास महिला:-

(१) अमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदांवरील दाव्यासाठी व कोणत्याही सामाजिक आरक्षणाचा दावा नसणा-या अमागास महिला उमेदवारांनी शासनाकडून विहित करण्यात आलेल्या नमुन्यात सक्षम प्राधिका-यांनी प्रदान केलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) कोणत्याही सामाजिक आरक्षणाचा दावा नसणा-या विवाहित अमागास महिला उमेदवारांनी त्यांच्या विवाहानंतरच्या कुटुंबाच्या उत्पन्नाच्या आधारे वितरित करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. सदर नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्राकरीता कुटुंबाच्या व्याख्येमध्ये पती, पत्नी व अविवाहित मुलांचा समावेश होईल.

(३) अविवाहित अमागास महिला उमेदवारांनी त्यांच्या वडिलांच्या कुटुंबाच्या उत्पन्नाच्या आधारे वितरित करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. कुटुंबाच्या व्याख्येमध्ये आई, वडील व अविवाहित भावंडाचा समावेश होईल.

(चार) मागासवर्गीय महिला:-

(१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील महिलांना नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

(२) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गातील महिलांनी त्यांच्या संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाकरीता आवश्यक असलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांना महिलांसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येईल.

(पाच) मागास प्रवर्गातील महिला उमेदवार अमागास महिलांसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरल्यास नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भात पुढील पर्याय उपलब्ध असतील:-

(१) अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गातील महिलांकडे जात प्रमाणपत्र असल्यास कोणतेही नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

(२) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या संबंधित मागास प्रवर्गाच्या आरक्षणाकरीता आवश्यक असलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

(३) मागास प्रवर्गातील महिला तिच्या संबंधित प्रवर्गाकरीताचे जात प्रमाणपत्र सादर करु शकत नसल्यास किंवा सादर करु इच्छित नसल्यास अमागास महिलांसाठी आरक्षित पदांवरील निवडीकरीता अमागास (खुल्या) महिलांकरीताचे नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

(४) अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाहापूर्वीचे नाव अंतर्भूत असलेली क्रिमीलेयरमध्ये मोडत नसल्याबाबतची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.

(सहा) विधवा / घटस्फोटीत / परित्यक्त्या महिला[१]:-

(१) विधवा महिलेच्या बाबतीत ती स्वतंत्र राहत असल्यास पतीच्या निधनामुळे प्राप्त झालेले उत्पन्न तसेच तिचे स्वत:चे उत्पन्न ग्राह्य धरुन वितरित केलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

(२) घटस्फोटीत महिलेच्या बाबतीत तिच्या भूतपूर्व पतीकडून मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मिळणा-या पोटगीची रक्कम व तिचे स्वत:चे उत्पन्न ग्राह्य धरुन वितरित केलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

(३) कौटुंबिक हिंसाचार अधिनियम २००५ अन्वये मा. न्यायालयात केस दाखल झालेली महिला स्वतंत्र राहत असल्यास अशा महिलेचे तिचे स्वत:चे उत्पन्न किंवा अशी महिला नोकरी करीत नसल्यास तिच्या वडिलांचे उत्पन्न नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्राकरीता ग्राह्य धरुन वितरित केलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

### ३.५.६ दिव्यांग व्यक्तीचे आरक्षण[२]:-

३.५.६.१ राज्य शासनाच्या सेवेतील सरळसेवा भरतीसाठी दिव्यांग व्यक्तींकरीता एकूण पदांच्या ४ % इतकी पदे खालीलप्रमाणे आरक्षित आहेत:-

| दिव्यांगत्वाचा गट | प्रकार | आरक्षणाचे प्रमाण |
|---|---|---|
| अ | अंध / अल्पदृष्टी | १% |
| ब | कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता | १% |

[१] शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र. १९१/१७/कार्या-२, दिनांक १५ डिसेंबर, २०१७

[२] दिव्यांग अधिकार अधिनियम २०१६ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ, दिनांक २९ मे, २०१९

| | | |
|---|---|---|
| क | अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) /कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy) | १% |
| ड | स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability)/ मानसिक आजार (Mental Illness) | १% |
| इ | वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणा-यासाठी त्यांचेसाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर | |

३.५.६.२ दिव्यांग अधिकार अधिनियम २०१६ नुसार केवळ उपरोक्त दिव्यांग प्रकारांकरीता आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय आहेत. उपरोक्त प्रकारांव्यतिरिक्त मज्जासंस्थेचे जुने आजार (क्रोनिक न्युरॉलॉजिकल कन्डिशन्स), वाचा व भाषा दोष (स्पीच अँन्ड लॅन्ग्वेज डिसॅबिलिटी), मल्टीपल स्क्लेरॉसिस, पार्किनसन्स डिसीज, हिमोफिलिया, सिकल सेल डिसीज, थॅलेसेमिया या दिव्यांग प्रकारांकरीता आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय नाहीत.

३.५.६.३ दिव्यांग आरक्षणाच्या पात्रतेकरीता दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.

३.५.६.४ दिव्यांग व्यक्तींकरीताचे आरक्षण एकूण समांतर आरक्षण आहे. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या सामाजिक प्रवर्गातून करण्यात येतो.[1]

३.५.६.५ दिव्यांगाच्या नियुक्तीसाठी पात्र ठरविण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्ती गुणवत्तेच्या आधारावर निवडीस पात्र ठरत असल्यास व त्यांचेसाठी पद आरक्षित नसले तरी निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येत नाही. [2]

३.५.६.६ सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे तसेच प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा दिव्यांग उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित पदावर करण्यात येत नाही व दिव्यांगासाठी आरक्षित पदे/पद इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात येतात.

३.५.६.७ वयोमर्यादा :-

दिव्यांग व्यक्तींसाठी शासकीय सेवेत प्रवेशासाठी कमाल मर्यादा वय वर्षे ४५ इतकी राहील.

३.५.६.८ दिव्यांगांसाठी पदांची सुनिश्चिती:-

(१) ज्या संवर्गासाठी आयोगाकडून जाहिरात विज्ञापित केलेली असेल, त्या संवर्गाकरीता शासनाकडून सुनिश्चित करण्यात आलेल्या दिव्यांग प्रकार व उपप्रकार असणारे उमेदवारच सदर संवर्गासाठी अर्ज करु शकतील.

(२) सुनिश्चितीच्या यादीमध्ये समाविष्ट नसलेल्या दिव्यांग उमेदवारांना संबंधित संवर्गासाठी अर्ज सादर करता येणार नाही.

३.५.६.९ आवश्यक प्रमाणपत्रे:-

(एक) दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र:-

दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या व्यक्तीने केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in [3] या संकेतस्थळावरुन सक्षम प्राधिका-याने वितरित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

(दोन) वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र:-

दिव्यांग उमेदवारांना त्यांच्याकरीता असलेल्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणे बंधनकारक आहे.

(तीन) जात प्रमाणपत्र-

दिव्यांग उमेदवार एखाद्या सामाजिक प्रवर्गातील असल्यास संबंधित सामाजिक प्रवर्गामध्ये गुणवत्तेनुसार निवडीसाठी पात्र ठरण्यासाठी व परीक्षा शुल्कामधील सवलतीकरीता संबंधित जातीचे वैध कालावधीचे नॉन क्रिमीलेअर (लागू असल्यास) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३.५.६.१० लेखनिक व अनुग्रह कालावधी[4]:-

(एक) लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाकडून जारी करण्यात आलेल्या "लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका, २०२१" नुसार तसेच तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

[1] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ, दिनांक २९ मे, २०१९

[2] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ, दिनांक २९ मे, २०१९

[3] शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८

[4] शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक :- दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दिनांक ५ ऑक्टोबर, २०२१

(दोन) परीक्षेच्या वेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छूक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यापूर्वी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचनां'चे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

**३.५.७ माजी सैनिकांसाठीचे आरक्षण :-**

३.५.७.१ माजी सैनिक उमेदवारांना शासन सेवेतील सरळसेवा भरतीच्या फक्त गट -क संवर्गातील पदांकरीता १५% समांतर आरक्षण लागू आहे.[१]

३.५.७.२ माजी सैनिकांसाठी आरक्षित पदावर राज्य शासनाच्या सेवेमध्ये गट-क मध्ये एकदा नियुक्ती झाल्यानंतर गट-क मध्ये तो धारण करीत असलेल्या पदापेक्षा उच्च श्रेणी वा अन्य संवर्ग यातील नियुक्तीसाठी माजी सैनिक म्हणून राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या आरक्षणाचा फायदा मिळणार नाही.[२]

३.५.७.३ नागरी सेवेत रुजू होण्यापूर्वी जर एखाद्या माजी सैनिकाने राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे, प्राधिकरणे, नगर पालिका, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, कंपन्या, जिल्हा परिषदा, अन्य संस्था व इतर सर्व कार्यालये इत्यादी यामधील विविध पदांसाठी अर्ज केलेले असतील तर प्रथम नियुक्ती स्वीकारल्यानंतर इतर पदांसाठी (प्रथम नियुक्ती स्वीकारण्यापूर्वी ज्या विविध पदांसाठी अर्ज केलेला आहे, त्या पदांकरीता) त्याची निवड झाल्यास नंतरच्या नियुक्तीसाठी तो माजी सैनिक, माजी सैनिकांसाठीच्या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ शकतो. तथापि, असा लाभ घेण्यासाठी खालील अटी लागू राहतील.[३]:-

(१) राज्य शासनाच्या (तसेच राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे, प्राधिकरणे, नगर पालिका, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, कंपन्या, जिल्हा परिषदा, अन्य संस्था व इतर सर्व कार्यालये इत्यादी यामधील) नागरी सेवेत प्रथमत: रुजू होताना, त्यावेळी त्याने ज्या विविध पदांसाठी अर्ज केलेले आहेत, त्याबाबतची दिनांकनिहाय सविस्तर माहिती स्वत:च्या स्वाक्षरीने लेखी स्वयंघोषणापत्राच्या स्वरुपात संबंधित नियुक्ती प्राधिका-यास देणे आवश्यक आहे.

(२) वर (१) मध्ये नमूद केलेल्या स्वयंघोषणापत्रात माजी सैनिकाने, त्याने अर्ज केलेल्या ज्या विविध पदांचा उल्लेख आहे, केवळ त्या पदांपैकीच कोणत्याही पदांवर त्याची निवड झाल्यास, जर त्या सरळसेवा पदभरतीस माजी सैनिकासाठीच्या समांतर आरक्षणाचे तत्व लाग़ू असेल, तरच त्यास माजी सैनिकासाठीच्या सवलतीचा फायदा घेता येईल. स्वयंघोषणापत्रात नमूद नसलेल्या पदांच्या बाबतीत त्यास सवलतीचा फायदा अनुज्ञेय राहणार नाही.

(३) प्रथम नियुक्ती स्वीकारताना माजी सैनिकाने जर स्वयंघोषणापत्र दिलेले नसेल तर नंतरच्या नियुक्तीसाठी माजी सैनिकांच्या सवलतीचा लाभ मिळणार नाही.

(४) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदावर शिफारशीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षित असलेली पदे पुढील भरती वर्षात समाविष्ट करण्यात येतील, पुढील भरती वर्षातही पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे संबंधित प्रवर्गातील गुणवत्ताक्रमानुसार अर्हताप्राप्त उमेदवारांमधून भरण्यात येतील.[४]

३.५.७.४ वयोमर्यादा:-

(एक) गट-'अ' व गट-'ब' संवर्गातील पदांकरीता[५]:-

(१) सरळसेवा भरती:-

सैन्यातील सलग सेवा किमान सहा महिने किंवा त्यापेक्षा जास्त झाली आहे, अशा माजी सैनिकांना सैन्यातील सेवेचा कालावधी अधिक तीन वर्षे इतकी कमाल वयाची सवलत देण्यात येईल. (म्हणजेच त्यांच्या वयातून सैनिकी सेवेचा कालावधी कमी केल्यावर परिणामभूत वय हे विहित वयोमर्यादेपेक्षा तीन वर्षाहून अधिक असू नये.)

(२) स्पर्धा परीक्षा:-

किमान पाच वर्षे सैन्यात सलग सेवा झाली आहे व ज्यांना नेमून दिलेले काम पूर्ण झाल्यावर कार्यमुक्त केले आहे (यामध्ये ज्यांचे नेमून दिलेले काम पुढील सहा महिन्यांत पूर्ण होणार आहे व त्यानंतर त्यांना कार्यमुक्त करण्यात येणार आहे, त्यांचाही समावेश आहे) किंवा ज्यांच्या बाबतीत पाच वर्षाचा सैनिकी सेवेचा नेमून दिलेला कालावधी पूर्ण झाला आहे व ज्यांची नेमणूक पाच वर्षापुढे वाढवून देण्यात आलेली असून त्यांना शासकीय सेवेत नेमणूक मिळाल्यास तीन महिन्यात कार्यमुक्त करण्यात येईल, असे प्रमाणित करण्यात येणार असेल, अशा माजी सैनिक/आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिका-यासाठी पाच वर्षे कमाल वयोमर्यादेत सवलत देण्यात येईल.

[१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीए-१०७३-पाच, दिनांक ८ ऑक्टोबर, १९७३ तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीए-१०७९/०/४८२/१६-अ, दिनांक ३ जुलै, १९८०

[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीए-१०९०/२२/ प्र.क्र.६/९३/१२, दिनांक ८ जून, १९९३.

[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:- संकीर्ण-२०१४/(प्र.क.३६४/१४)/२८, दिनांक ३ जून, २०१६.

[४] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:-आरटीए १०७९/०/४८२/१६-अ, दिनांक १६ एप्रिल, १९८१

[५] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीए-१०८८/११९२/सीआर-३२/८९/१६-अ, दिनांक २८ मे, १९९२

(दोन) गट-'क' व गट-'ड' संवर्गातील पदांकरीता [1]:-

(१) माजी सैनिकासाठी शासन सेवेतील गट-क व गट-ड संवर्गातील नेमणुकीकरिता लागू असलेली विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्षे इतकी राहील.

(२) दिव्यांग माजी सैनिकांसाठी 'गट-क' व 'गट-ड' संवर्गातील पदांसाठी नेमणुकीकरिता कमाल वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षांपर्यंत राहील.

(३) बडतर्फीने, गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारीरिक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे सेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक/आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत.५

(४) राज्य शासनाच्या सेवेमध्ये गट-क व गट-ड संवर्गामध्ये माजी सैनिकाची एकदा नियुक्ती झाल्यानंतर गट - क व गट - ड संवर्गामध्ये तो धारण करीत असलेल्या पदापेक्षा उच्च श्रेणी वा अन्य संवर्ग यातील नियुक्तीसाठी माजी सैनिक म्हणून अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या वयोमर्यादेची सूट सदर नवीन नियुक्तीसाठी देखील अनुज्ञेय राहील.[2]

३.५.७.५ लाभार्थी/पात्र व्यक्ती:-

(१) An "Ex-Serviceman" means a person,[3]

(i) Who has served in any rank whether as combatant or as non - combatant in the Regular Army, Navy and Air Force of the Indian Union, and

(a) who either has been retired or relieved or discharged from such service whether at his own request or being relieved by the employer after earning his or her pension; or

(b) who has been relieved from such service on medical grounds attributable to military service or circumstances beyond his control and awarded medical or other disability pension; or

(c) Who has been released from such service as a result of reduction in establishment; or

(ii) who has been released from such service after completing the specific period of engagement, otherwise than at his own request or by way of dismissal, or discharge on account of misconduct or inefficiency and has been given a gratuity; and includes personnel of the Territorial Army, namely, pension holders for continuous embodied service or broken spells of qualifying service; or

(iii) personnel of the Army Postal Service who are part of Regular Army and retired from the Army Postal Service without reversion to their parent service with pension, or are released from the Army Postal Service on medical grounds attributable to or aggravated by military service or circumstances beyond their control and awarded medical or other disability pension; or

(iv) Personnel, who were on deputation in Army Postal Service for more than six months prior to the 14th April, 1987;or

(v) Gallantry award winners of the Armed forces including personnel of Territorial Army; or

(vi)Ex-recruits boarded out or relieved on medical ground and granted medical disability pension.

(२) "Explanation — The persons serving in the Armed Forces of the Union, who on retirement from service, would come under the category of 'ex-servicemen', may be permitted to apply for re-employment one year before the completion of the specified terms of engagement and avail themselves of all concessions available to ex-servicemen but shall not be permitted to leave the uniform until they complete the specified term of engagement in the Armed Forces of the Union."[4]

३.५.७.६ आवश्यक प्रमाणपत्र:-

(१) सैनिकी सेवेतून मुक्त केल्याबाबतचे प्रमाणपत्र:-

---

[1] शासन शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ,दिनांक २० ऑगस्ट, २०१०

[2] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीए-१०९०/२२/ प्र.क्र.६/९३/१२, दिनांक ८ जून, १९९३

[3] Ex-servicemen (Re-employment in Central Civil Services and Posts) Amendment Rules, २०१२.

[4] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मासैक-१०१२/प्र.क्र.१९८/१६-अ, दिनांक ३० एप्रिल, २०१३.

माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादा व आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिकार्‍याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) जात प्रमाणपत्र व नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र:-

उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गामध्ये समाविष्ट होत असेल, त्या प्रवर्गासंबंधीचे जात प्रमाणपत्र तसेच वैध नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास) संबंधित जाहिरातीस अनसरुन करण्यात येणा-या अर्जासोबत (लागू असल्यास पूर्व परीक्षेच्या) सादर करणे आवश्यक आहे.

**३.५.११ प्राविण्यप्राप्त खेळाडूंचे आरक्षण[१]:-**

३.५.११.१ खेळाडूंच्या आरक्षित पदांकरीता उमेदवार हा महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवासी असावा व त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.[२]

३.५.११.२ खेळाडू आरक्षणांकरीता नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू राहणार नाही.[३]

३.५.११.३ खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारानी त्यांची प्रमाणपत्रे ते ज्या संवर्गासाठी अर्ज करीत आहेत, त्याकरिता विहित दर्जाची आहेत काय तसेच खेळाचा कालावधी अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचा आहे काय, याची अर्ज सादर करतानाच खातरजमा करुन ती, उमेदवार ज्या विभागातील आहे, त्या विभागातील उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांच्या कडून प्रमाणित करुन घ्यावीत. तरच त्यांना गुणवत्ता धारक पात्र खेळाडू आरक्षणाचा लाभ घेता येईल.[३]

३.५.११.४ राज्य शासनाच्या सेवेत यापूर्वीच असलेल्या उमेदवारांना त्यांनी क्रीडा क्षेत्रात अधिक वरिष्ठ स्थान अथवा पदक प्राप्त केल्यास व ते शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इत्यादी बाबींसह पात्र असल्यास वरिष्ठ जागेसाठी ते अर्ज करण्यास पात्र राहतील.

३.५.११.५ एखादा खेळाडू उमेदवार 'अ' गटातील नेमणुकीसाठी पात्र असून त्याने 'ब' किंवा 'क' संवर्गातील पदासाठी अर्ज केल्यास त्याचा विचार करण्यात येईल.

**३.५.११.६ क्रीडाविषयक अर्हता[३]:-**

| अ.क्र. | स्पर्धा प्रकार | पात्रताविषयक अटी | खेळविषयक पात्रता |
|---|---|---|---|
| **भाग-पहिला** | **गट-अ संवर्गातील पदाकरीता** | | |
| (एक) | **अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा -**<br>(१) ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा<br>(२) एशियन गेम्स<br>(३) जागतिक क्रीडा स्पर्धा<br>(४) एशियन चॅम्पियनशीप<br>(५) कॉमनवेल्थ गेम्स<br>(६) कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप<br>(७) युथ ऑलिम्पिक<br>(८) ग्रॅंडमास्टर (बुध्दिबळ) | या क्रीडा स्पर्धांना ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धांमध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी, खो-खो व मल्लखांब[४] हे देशी खेळच ५ % आरक्षणासाठी पात्र राहतील. | **(१) वैयक्तिक स्पर्धा** - महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधीत्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक / ग्रॅन्डमास्टर किताब अथवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग<br>**(२) सांघिक स्पर्धा** — महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक |
| (दोन) | **जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा -**<br>जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा बोर्डाने आयोजित केलेले खेळ | | |
| (तीन) | **आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाव्दारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा**<br>आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाव्दारे आयोजित केलेले खेळ | | |
| (चार) | **पॅरॉलिम्पिक आंतरराष्ट्रीय स्पर्धा -**<br>(१) पॅरॉलिम्पिक गेम्स<br>(२) पॅरा एशियन गेम्स<br>(३) वर्ल्ड पॅरॉलिम्पिक गेम्स | | |

[१] शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६.

[२] शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६

[३] शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १० ऑक्टोबर, २०१७

[४] शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७

| | | | |
|---|---|---|---|
| (पाच) | **ग्रँड मास्टर किताब** | | |
| **भाग-दुसरा** | **गट-ब संवर्गातील पदाकरीता** | | |
| **(एक)** | गट-अ पदाकरीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू | | |
| (दोन) | **अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा (कनिष्ठ गट)** | या क्रीडा स्पर्धांना ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धांमध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी, खो-खो व मल्लखांब४ हे देशी खेळच आरक्षणासाठी पात्र राहतील. | **(१) वैयक्तिक स्पर्धा —** महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधीत्व करताना / महाराष्ट्राचे / विद्यापिठाचे प्रतिनिधीत्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक / अथवा आंतरराष्ट्रीय मास्टर किताब मिळविणे आवश्यक.<br>**(२) सांघिक स्पर्धा —** महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने / महाराष्ट्राच्या / विद्यापिठाचे संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक / ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग. |
| | (१) ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशीप | | |
| | (२) युथ कॉमनवेल्थ गेम्स | | |
| | (३) कनिष्ठ गटातील एशियन चॅम्पियनशीप | | |
| | (४) कनिष्ठ गटातील कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप | | |
| | (५) आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा (बुध्दिबळ) | | |
| (तीन) | **राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (वरिष्ठ गट)** | | |
| | (१) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा | | |
| | (२) अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट) | | |
| (चार) | **राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (कनिष्ठ गट)** | | |
| | राष्ट्रीय ज्युनियर गट अजिंक्यपद स्पर्धा | | |
| (पाच) | **राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा** | | |
| (सहा) | **राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा** | | |
| (सात) | **अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा** | | |
| (आठ) | **आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा** | | |
| (नऊ) | **पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा** | | |
| | पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय अजिंक्य पद स्पर्धा | | |
| **भाग-तिसरा** | **गट-क संवर्गातील पदाकरीता** | | |
| **(एक)** | गट-अ व गट-ब या संवर्गातील पदाकरीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू | | |
| (दोन) | **राज्यस्तर क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट** | सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉनमवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी, खो-खो व मल्लखांब [१] हे देशी खेळच खेळाडू आरक्षणासाठी पात्र असतील. | **(१) वैयक्तिक स्पर्धा —** राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे / राज्य स्तरावर संबंधित विभाग/ जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करुन प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक.<br>**(२) सांघिक स्पर्धा —** राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे / राज्य स्तरावर संबंधित विभाग / जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करुन संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक |
| | राज्यस्तर वरिष्ठ गट अजिंक्यपद स्पर्धा | | |
| (तीन) | **राज्यस्तर कनिष्ठ क्रीडा स्पर्धा** | | |
| | राज्यस्तर कनिष्ठ गट अजिंक्यपद स्पर्धा | | |
| (चार) | **राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा** | | |
| (पाच) | **राज्यस्तर ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा** | | |
| (सहा) | **राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध)** | | |
| (सात) | **राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा** | | |
| (आठ) | **राज्यस्तर पॅराऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा** | | |
| (नऊ) | **राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा** | | |

३.५.११.७ संबंधित क्रीडा स्पर्धामध्ये केवळ भाग/सहभाग घेतलेले खेळाडू उमेदवार गट-अ, गट-ब, गट-क संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीसाठी पात्र नाहीत.

३.५.११.८ वयोमर्यादेत सवलत:-

पात्र खेळाडू उमेदवारांना कमाल वयोर्यादेमध्ये ५ वर्षापर्यंत सूट देय ठरते, तथापि, कोणत्याही परिस्थितीत उच्च वयोमर्यादा ४३ वर्षे इतकीच राहील.

३.५.११.९ आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे:-

[१] शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७

(एक) जात प्रमाणपत्र:-

मागास प्रवर्गातील खेळाडू उमेदवार यांना त्यांच्या संबंधित सामाजिक प्रवर्गातील दाव्यांच्या अनुषंगाने जात प्रमाणपत्र (लागू असल्यास वैध नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्रासह) जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करताना अर्जासोबत (लागू असल्यास पूर्व परीक्षेच्या अर्जासाबत) सादर करणे आवश्यक आहे.

(दोन) क्रीडाविषयक पुरावा[१]:-

(१) क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास –

(अ) दोन किंवा त्यापेक्षा जास्त टप्प्यांवर आयोजित परीक्षेसाठी पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करतानाच क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

(ब) एकाच टप्प्यावर आयोजित परीक्षा/पदभरतीसाठी अर्जासोबत क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

(२) क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास[२] –

(अ) दोन किंवा त्यापेक्षा जास्त टप्प्यावर आयोजित परीक्षेसाठी पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाआधी किंवा एकाच टप्प्यावर आयोजित परीक्षा/भरतीसाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाआधी वास्तव्यास असलेल्या विभागातील उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांचेकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केलेला असणे बंधनकारक आहे.

(ब) उमेदवाराने कोणत्या विभागातील उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केला आहे, हे अर्जामध्ये नमूद करणे तसेच त्याची पोचपावती जोडणे / अपलोड करणे बंधनकारक आहे.

(३) मुलाखत, शारीरिक चाचणी अथवा प्रमाणपत्र पडताळणीच्या कोणत्याही टप्प्यावर क्रीडा प्रमाणपत्राचा पडताळणी अहवाल सादर न केल्यास संबंधित उमेदवार खेळाडूंच्या आरक्षणासाठी तसेच वयोमर्यादेतील सवलतीकरीता पात्र असणार नाही.

(४) अर्जासोबत सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल अथवा संबंधित प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीकरीता केलेल्या अर्जाची पोचपावती सादर न केल्यास त्याच टप्प्यावर खेळाडू आरक्षणाचा दावा रद्द करण्यात येईल.

(५) एखाद्या खेळाडूकडे एकापेक्षा जास्त खेळांची राज्य/राष्ट्रीय स्पर्धांची प्राविण्य प्रमाणपत्रे असू शकतील अशा खेळाडूने एकाच वेळेस सर्व प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक यांच्याकडे सादर करणे गरजेचे आहे.

(६) संबंधित पदाच्या भरतीसाठी सादर केलेल्या अर्जात, खेळाडूने जे प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांना पडताळणीसाठी सादर केली असल्याचा दावा केला असेल केवळ त्याच प्रमाणपत्राच्या पात्रतेचा अहवाल नियुक्तीच्या पुढील प्रयोजनार्थ गृहित धरला जाईल.

(७) अन्य खेळातील आणि परीक्षेच्या अन्य कोणत्याही टप्प्यावर सादर करण्यात येणारे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(८) क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल अथवा पोच पावती अर्जासोबत सादर न केल्यास उमेदवारास खेळाडूकरीताच्या आरक्षण व वयोमर्यादेचा लाभ मिळणार नाही.

(९) पूर्व परीक्षेच्या अर्जासोबत पोच पावती सादर/अपलोड केलेल्या उमेदवारास मुख्य परीक्षेस अर्ज सादर करताना अर्जासोबत क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल सादर/अपलोड करणे, अनिवार्य राहील.

(१०) एकच परीक्षा व मुलाखत किंवा केवळ मुलाखतीद्वारे राबविण्यात येणा-या भरतीप्रक्रियेकरीता मुलाखतीच्या वेळी क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल सादर / अपलोड करणे अनिवार्य राहील.

(११) गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवाराकडे एकापेक्षा जास्त खेळविषयक प्रमाणित प्रमाणपत्रे असल्यास, त्याबाबतची नोंद उमेदवाराने त्याच्या प्रोफाईलमध्ये / अर्जामध्ये करण्यात यावी. तसेच अशा सर्व प्रमाणित प्रमाणपत्राची प्रत जोडावी / अपलोड करावी.

(१२) अर्जाद्वारे दावा न केलेल्या अन्य प्रमाणित क्रीडा प्रमाणपत्राचा विचार, नंतरच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही परिस्थितीत करण्यात येणार नाही.

---

[१] शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै २०१६

[२] शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक संकीर्ण १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून २०२२

### ३.५.१२ अनाथ व्यक्तींचे आरक्षण [१] [२]:-

३.५.१२.१ अनाथ व्यक्ती:-

१) "अ" प्रवर्ग:- पुर्णत: अनाथ असलेली बालके, ज्यांच्या आई-वडील, भाऊ-बहीण, जवळचे नातेवाईक,गाव, तालुका, पत्ता याबाबत काहीही माहिती उपलब्ध नाही, आणि त्या बालकांचे पालनपोषण बालकांच्या काळजीसाठी कार्यरत संस्थेत/ अनाथालयात झाले आहे.

२) "ब" प्रवर्ग:- ज्या मुलाचे आई-वडील यांचे निधन झालेले आहे. तथापि, त्यांच्या नातेवाईकांबाबत माहिती उपलब्ध असून त्यांच्या कागदपत्रावर जातीचा उल्लेख करण्यात आलेला आहे, आणि त्या बालकांचे पालनपोषण बालकांसाठी कार्यरत संस्थेत/ अनाथालयात झाले आहे.

३) "क" प्रवर्ग:- ज्या मुलाचे आई-वडील यांचे निधन झाले आहे, परंतु, त्या मुलाचे इतर नातेवाईक जिवंत असून बालकाचे संगोपन नातेवाईकांकडे झालेले असून बालकाच्या जातीबाबतचीही माहिती उपलब्ध आहे.

३.५.१२.२ अनाथांच्या आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता उमेदवार महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवासी (Domicile) असणे आवश्यक आहे.

३.५.१२.३ महिला व बाल विकास विभागाकडून ज्या अनाथ मुलांना अनाथ प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत, अशी बालके आरक्षणासाठी पात्र राहतील. तथापि, ज्या अनाथ मुलांच्या आई-वडीलांचे निधन त्या मुलाच्या वयाची १८ वर्षे पुर्ण होण्यापुर्वी झाले असेल, अशाच बालकांना आरक्षण अनुज्ञेय राहील.

३.५.१२.४ अनाथ आरक्षणाची अंमलबजावणी दिव्यांगांच्या आरक्षणाप्रमाणे करण्यात येईल.

३.५.१२.५ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गात करण्यात येईल.

३.५.१२.६ भरती वर्षात पात्र अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर आरक्षित जागेचा अनुशेष पुढील भरती वर्षासाठी ओढण्यात येईल. जर पुढील भरती वर्षातही पात्र अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद अनाथांव्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येईल.

३.५.१२.७ अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रूजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

३.५.१२.८ अनाथालयात दाखल करण्यात येणाऱ्या काही बालकांची जात माहित नसताना त्यांच्या शैक्षणिक प्रवेशासाठी अंदाजे जात नमूद केल्याचे निदर्शनास येते. अशा बालकांच्या जात प्रमाणपत्राची वैधता होऊ शकत नसल्यास सदर उमेदवारास पदभरती अथवा शैक्षणिक प्रवेशानंतर अराखीव समजण्यात यावे.

३.५.१२.९ वय:-अनाथ उमेदवारांना अनुसुचित जाती प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणे उच्च वयोमर्यादेमध्ये पाच वर्षापर्यंतची सूट राहील.[३]

३.५.१२.१० परीक्षा शुल्क:-अनाथ उमेदवारांना अनुसुचित जाती प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्कामध्ये सूट राहील. ३

३.५.१२.११ आवश्यक प्रमाणपत्र:-

(एक) अनाथ प्रमाणपत्र:-

विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास यांच्याकडून वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र.[४] पूर्व परीक्षेच्या अर्जासोबत सादर/अपलोड करणे आवश्यक आहे.

(दोन) वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र / अधिवास प्रमाणपत्र:-

सक्षम प्राधिका-याकडून वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील अधिवास प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्जासोबत सादर/अपलोड करणे आवश्यक आहे.

---

[१] शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक: अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक २ एप्रिल, २०१८

[२] शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक: अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-३, दिनांक २३ ऑगस्ट, २०२१

[३] शासन परिपत्रक, महिला व बालविकास विभाग, क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.८२/का-३, दिनांक २० ऑगस्ट २०१९

[४] शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दिनांक ६ जून, २०१६

**३.५.१३ प्रकल्पग्रस्तांचे आरक्षण[१] :-**

३.५.१३.१ प्रकल्पग्रस्तांकरीता शासन सेवेतील सरळसेवा भरतीच्या फक्त गट -क संवर्गातील पदांकरीता ५% समांतर आरक्षण लागू आहे. सदर आरक्षण सामाजिक प्रवर्गांतर्गत कप्पीकृत आहे.[२]

३.५.१३.२ लाभार्थी:-

(१) केंद्र शासन किंवा राज्य शासन यांनी हाती घेतलेल्या पाटबंधारे, वीज अथवा इतर कोणत्याही प्रकल्पामुळे ज्या व्यक्तींचे घर आणि/अथवा जमीन पूर्णत: किंवा अंशत: संपादण्यात आली असेल, अशा व्यक्ती किंवा प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून असणारी व्यक्ती.

(२) प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीमध्ये प्रकल्पग्रस्त व्यक्तीचा पती अथवा पत्नी, अज्ञान मुलगे, अविवाहीत मुली, अज्ञान भाऊ किंवा बहिणी, आई व वडील, अविवाहीत नात, नातू, सून यांचा समावेश होतो.

(३) प्रकल्पग्रस्ताकरीताच्या आरक्षणाचा लाभ कुटुंबातील फक्त एकाच व्यक्तीस अनुज्ञेय आहे. तथापि, ज्या प्रकल्पासाठी भूसंपादनाची कार्यवाही १ जून १९६५ पूर्वी सुरु करण्यात आली, त्यामुळे ज्या व्यक्ती प्रकल्पग्रस्त झाल्या, अशा प्रकल्पग्रस्त व्यक्तींच्या कुटुंबातील जास्तीत जास्त दोन व्यक्तींना प्रकल्पग्रस्तांचे लाभ अनुज्ञेय ठरतात.

३.५.१३.३ वय:- उच्च वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षापर्यंत[३].

३.५.१३.४ परीक्षा शुल्क:- संबंधित सामाजिक प्रवर्गाप्रमाणे परीक्षा शुल्क अनुज्ञेय राहील.

३.५.१३.५ आवश्यक प्रमाणपत्र:-

(एक) प्रकल्पग्रस्त दाखला/प्रमाणपत्र:-

संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या वतीने संबंधित पुनर्वसन अधिकारी यांनी प्रकल्पग्रस्त व्यक्तीला अथवा प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबातील तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला नोकरीविषयक सवलतीच्या संदर्भात दिलेला दाखला/प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्जासोबत सादर/अपलोड करणे आवश्यक आहे.

(दोन) वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र / अधिवास प्रमाणपत्र:-

सक्षम प्राधिका-याकडून वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील अधिवास प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्जासोबत सादर/अपलोड करणे आवश्यक आहे.

३.५.१४ भूकंपग्रस्तांचे आरक्षण [४]:-

३.५.१४.१ भूकंपग्रस्तांकरीता शासन सेवेतील सरळसेवा भरतीच्या फक्त गट -क संवर्गातील पदांकरीता २% समांतर आरक्षण लागू आहे. सदर आरक्षण सामाजिक प्रवर्गांतर्गत कप्पीकृत आहे.

३.५.१४.२ लाभार्थी:-

(१) भूकंपग्रस्त कुटुंब:-

(एक) लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील जी ५२ गावे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत त्यातील कुटुंबे

(दोन) ज्यांची घरे पूर्णत: उद्ध्वस्त झाली आहेत.

(तीन) ज्यांच्या व्यवसायाची जागा अथवा व्यवसाय पूर्णपणे उद्ध्वस्त झाले असल्याने जगण्याचे साधन नष्ट झाले आहे.

(२) भूकंपग्रस्त कुटुंबामध्ये पती/ पत्नी/ मुलगा व अविवाहीत मुलगी, कुटुंबात राहणारे व कुटुंबप्रमुखावर अवलंबून असणारे भाऊ व बहीण, नातू आणि सून[५], नातूची पत्नी, नात, पणतू, पणतूची पत्नी व पणती, खापर पणतू, खापर पणतूची पत्नी व खापर पणती यांना भूकंपग्रस्ताच्या आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय आहेत[६].

(३) भूकंपग्रस्ताकरीताच्या आरक्षणाचा लाभ कुटुंबातील फक्त एकाच व्यक्तीस अनुज्ञेय आहे.[२]

३.५.१४.३ वय:- उच्च वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षापर्यंत शिथिलथम राहील.[७]

३.५.१४.४ परीक्षा शुल्क:- संबंधित सामाजिक प्रवर्गाप्रमाणे परीक्षा शुल्क अनुज्ञेय राहील.

३.५.१४.५ आवश्यक प्रमाणपत्र:-

(एक) भूकंपग्रस्त दाखला/प्रमाणपत्र[२]:-

संबंधित जिल्हाधिकारी यांनी वितरित केलेला भूकंपग्रस्त असल्याचा दाखला/प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्जासोबत सादर/अपलोड करणे आवश्यक आहे.

---

[१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एईएम१०८०/३५/१६-अ. दिनांक २० जानेवारी, १९८०

[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट २००९

[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रकल्प १००६/मुसर२९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ, दिनांक ३ फेब्रुवारी २००७

[४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट २००९

[५] शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रमांक ईक्यूआर १०९४/प्र.क्र.७६८/भूपुक-१, दिनांक ९ ऑगस्ट १९९५

[६] शासन निर्णय, महसुल व वन विभाग(मदत व पुनर्वसन), क्रमांक आव्यप्र-२०२०/प्र.क्र.४३/आव्यप्र-२, दिनांक २४ नोव्हेंबर २०२२

[७] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रकल्प १००६/मुसर२९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ, दिनांक ३ फेब्रुवारी २००७

(दोन) वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र / अधिवास प्रमाणपत्र:-

सक्षम प्राधिका-याकडून वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील अधिवास प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्जासोबत सादर/अपलोड करणे आवश्यक आहे.

३.५.१४.६ भूकंपग्रस्तांकरीता आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र उमेदवार न मिळाल्यास सदर पदावर प्रकल्पग्रस्त व्यक्तीची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येते.[१]

३.५.१५ पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांचे आरक्षण[२] :-

३.५.१५.१ पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांचेकरीता शासन सेवेतील सरळसेवा भरतीच्या फक्त गट -क संवर्गातील पदांकरीता १०% समांतर आरक्षण लागू आहे. सदर आरक्षण सामाजिक प्रवर्गांतर्गत कप्पीकृत आहे.

३.५.१५.२ लाभार्थी:-

सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंनर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर अंशकालीन उमेदवारांना आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय आहेत.

३.५.१५.३ वय:- उच्च वयोमर्यादा वयाच्या ५५ वर्षापर्यंत शिथिलथम राहील.[३]

३.५.१५.४ परीक्षा शुल्क:- संबंधित सामाजिक प्रवर्गाप्रमाणे परीक्षा शुल्क अनुज्ञेय राहील.

३.५.१५.५ आवश्यक प्रमाणपत्र:-

(एक) अनुभव प्रमाणपत्र[४]:-

संबंधित तहसीलदार यांनी वितरित केलेला अनुभवाचा दाखला/प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्जासोबत सादर/अपलोड करणे आवश्यक आहे.

(दोन) वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र / अधिवास प्रमाणपत्र:-

सक्षम प्राधिका-याकडून वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील अधिवास प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्जासोबत सादर/अपलोड करणे आवश्यक आहे.

३.५.१५.६ पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांकरीता आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र उमेदवार न मिळाल्यास सदर पदावर सर्वसाधारण उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येते.[५]

## ३.६ महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील उमेदवारांसदर्भातील तरतुदी[६]:-

३.६.१ महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवार संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमातील सर्व अटींची पूर्तता करीत असल्यास, ते महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी अर्ज करण्यास व गुणानुक्रमे निवड होत असल्यास सदर पदांवर नेमणूकीसाठी पात्र असतील.

३.६.२ ज्या पदांकरीता महाराष्ट्रातील किमान १५ वर्षे वास्तव्याची अट विहित करण्यात आली असेल त्या पदांसाठी महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील वास्तव्य विचारात घेण्यात येईल. तथापि, उमेदवार सदर ८६५ गावांमध्ये वास्तव्यास असल्याबाबतचा त्यांचा वास्तव्याच्या सक्षम प्राधिका-यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

३.६.३ सदर उमेदवार अराखीव-सर्वसाधारण पदावरील निवडीकरीता पात्र असतील. अराखीव-सर्वसाधारण पदे सोडून इतर कोणत्याही आरक्षित पदावरील निवडीकरीता सदर उमेदवार पात्र ठरत नाहीत.

---

[१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक विकाक २२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दिनांक ४ नोव्हेंबर २०१६

[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पअंक १००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर २००९

[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अशंका १९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दिनांक २ जानेवारी, २०१९

[४] शासन परिपत्रक, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्रमांक ईएसई-२००३/प्र.क्र.४८/रोस्वरो-१, दिनांक ७ मार्च २००३

[५] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक विकाक २२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दिनांक ४ नोव्हेंबर २०१६

[६] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६, दिनांक १० जुलै, २००८.

**प्रकरण क्रमांक—चार**

# कागदपत्रे / पुरावा

**४.१** अर्जाद्वारे आयोगाकडे केलेल्या विविध दाव्याच्या पुष्ठयर्थ विहित टप्प्यावर प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी पात्रतेसंदर्भात खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे:-

**४.१.१ वयाचा पुरावा** (खालीलपैकी कोणताही एक पुरावा):-

(१) मॅट्रिकचे प्रमाणपत्र/माध्यमिक शालांत प्रमाणपत्र

(२) विहित नमुन्यातील सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले वयाचे प्रमाणपत्र

(३) शासनाच्या स्थायी सेवेतील उमेदवारांच्या बाबतीत -उपरोल्लेखित प्रमाणपत्र किंवा त्यांच्या सेवा अभिलेख्यात नोंदविलेला त्यांचा जन्मदिनांक नमूद करणा-या सेवा अभिलेख्यातील उता-याची प्रमाणित प्रत

(४) जन्म दिनांक नमूद असलेला शाळा/महाविदयालय सोडल्याचा दाखला.

(५) नगर पालिका / महानगरपालिका / ग्रामपंचायतीचा जन्म दाखला.

(६) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील पदासाठी अर्ज करणारे महानगरपालिकेच्या स्थायी सेवेतील उमेदवार किंवा बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या नियंत्रणाखालील पदासाठी अर्ज करणारे उपक्रमाच्या स्थायी सेवेतील उमेदवार यांना उपरोल्लेखित प्रमाणपत्र किंवा त्यांचा जन्मदिनांक नमूद करणा-या त्यांच्या सेवा अभिलेखातील प्रमाणित उता-याची प्रत सादर करता येईल.

(७) उमेदवार शासकीय किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या किंवा बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या स्थायी सेवेत आहे, ही बाब अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद केली असेल, तरच प्रमाणित उता-याच्या प्रती स्वीकारण्यात येतील.

(८) शासनाच्या अस्थायी सेवेतील उमेदवारांच्या बाबतीत जे उमेदवार त्यांच्या नियुक्तीच्या वेळी वयाधिक असतील, त्यांनी उपरोल्लेखित पुराव्याव्यतिरिक्त सक्षम प्राधिका-याच्या वयोमर्यादा शिथिल करण्याबाबतच्या आदेशाची प्रमाणित प्रत सादर करणे आवश्यक राहील.

(९) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांच्या बाबतीत, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका, अथवा बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या सेवेतील पदाच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याचा दावा करणा-या उमेदवारांबाबतीत (लागू असेल तेथे) विहित नमुन्यातील सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर केल्यासच त्यांचा वयोमर्यादेतील सवलतीसाठी विचार करण्यात येईल.

**४.१.२ शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा**:-

(१) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षेच्या किंवा एखाद्या तत्सम परीक्षेच्या बाबतीत, संबंधित मंडळाचे प्रमाणपत्र. अशा प्रमाणपत्राऐवजी शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र स्वीकारण्यात येणार नाही.

(२) उत्तीर्ण केलेल्या पदवी परीक्षांच्या किंवा पदविका परीक्षांच्या बाबतीत प्रत्येक परीक्षेचे विद्यापीठाने / सक्षम प्राधिका-याने औपचारिकरित्या प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करावे.

(३) पदवी परीक्षा ही पात्रता आवश्यक असलेल्या आणि तांत्रिक अथवा व्यावसायिक कामाचा अनुभव आवश्यक ठरविलेला नसलेल्या पदांच्या बाबतीत १५ वर्षे सेवा झालेल्या माजी सैनिकांनी एस.एस.सी. उत्तीर्ण असल्याचे किंवा इंडियन आर्मी स्पेशल सर्टिफिकेट ऑफ एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(४) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा, ही पात्रता आवश्यक असलेल्या पदासाठी १५ वर्षे सैनिकी सेवा झालेल्या माजी सैनिकांनी इयत्ता ८ वी उत्तीर्ण असल्याचे किंवा इंडियन आर्मी फर्स्ट क्लास सर्टिफिकेट ऑफ एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(५) गुणांऐवजी श्रेणी पद्धत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करणे आवश्यक राहील.

(६) जेथे पदवीकरिता CGPA / OGPA or Letter grade देण्यात येते, तेथे संबंधित विद्यापीठ / संस्थेच्या निकषानुसार शेकडा गुण नमूद करावेत. गुणांची टक्केवारी पूर्णांकात रूपांतरित करू नये (उदा.५४.५० % असतील तर ५५% नमूद करू नये.)

**४.१.३ मागासवर्गीय उमेदवार असल्याबद्दल पुरावा**:-

(१) राज्य शासनाने भरती करण्याच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जमाती म्हणून मान्यता दिलेल्या जमातींपैकी असल्याचा दावा करणा-या अथवा अनुसुचित जातीमधील धर्मांतरीत बौध्द असल्याचा दावा केलेल्या उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याने प्रदान केले विहित नमुन्यातील जातीविषयक प्रमाणपत्र.

(२) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) तसेच इतर मागास प्रवर्ग म्हणून मान्यता दिलेल्या जाती /जमातीपैकी एखाद्या गटाचा असल्याचा दावा करणा-या उमेदवारांनी शासनाकडून वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार विहित नमुन्यातील सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले जातीविषयक प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक राहील.

### ४.१.४ नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र :-

(१) राज्य शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या पहिल्या तीनही परिच्छेदात उमेदवाराचे स्वत:चे नाव नमूद केलेले असणे आवश्यक आहे.

(३) मागासवर्गीय विवाहित महिलांच्या बाबतीत पूर्वाश्रमीच्या नावाने जातीचे व नॉन-क्रिमी लेअरचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(४) विशेष कार्यकारी अधिकारी किंवा मानसेवी दंडाधिकारी असलेल्या अथवा सक्षम प्राधिकारी नसलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने दिलेले जातीचे अथवा नॉन-क्रिमी लेअरचे प्रमाणपत्र कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही.

(५) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, क्रमांक सीबीसी-२०१२/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक २५ मार्च २०१३ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार संबंधित जाहिरातीमध्ये नमूद अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांक(दोन टप्प्यातील परीक्षांच्या बाबतीत पूर्व परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक) संबंधित उमेदवार उन्नत व प्रगत व्यक्ती गटामध्ये मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी गृहित धरण्यात येईल.

(६) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दिनांक १७ ऑगस्ट, २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन क्रीमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

### ४.१.५ मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा :-

(१) माध्यमिक/शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा मॅट्रिक किंवा विद्यापीठीय उच्च परीक्षा संबंधित भाषा विषय घेऊन उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र; अथवा

(२) उमेदवार उत्तम रितीने मराठी भाषा वाचू, लिहू आणि बोलू शकतो अशा आशयाचे संविधिक विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील किंवा पदव्युत्तर संस्थेतील भाषा शिक्षकाने दिलेले आणि महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या प्राचार्यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले प्रमाणपत्र.

### ४.१.६ दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा :-

दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा तसेच वयोमर्यादेतील सवलतीच्या लाभासाठी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग अप्रवि-२०१५/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले किमान ४०% कायमस्वरुपी दिव्यांगत्व असल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

### ४.१.७ माजी सैनिक असल्याचा पुरावा :-

(१) माजी सैनिकांसाठी असलेल्या सवलतीचा वयोमर्यादेचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यात (लागू असेल त्याप्रमाणे) सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) माजी सैनिक उमेदवाराने विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर माग़ासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील पद भरतीसाठी आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्ज केला असेल तर संबंधित प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणे माजी सैनिकांना देखील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

### ४.१.८ महिला आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा :-

(१) मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित पदाकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) असल्याबाबत तसेच नॉन क्रिमीलेअरमध्ये मोडत असल्याबाबत [अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक वगळून] स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

(२) अमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी दावा करणा-या अमागास महिला उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिका-यांनी प्रदान केलेले नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

### ४.१.९ खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा :-

प्राविण्यप्राप्त खेळाडूंसाठी आरक्षित पदावर दावा करणा-या उमेदवारांनी सक्षम प्राधिका-यांनी प्रदान केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पडताळणी अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

### ४.१.१० अनाथ असल्याचा पुरावा:-

विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास यांच्याकडून वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**४.१.११ प्रकल्पग्रस्त असल्याचा पुरावा:-**

संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या वतीने संबंधित पुनर्वसन अधिकारी यांनी प्रकल्पग्रस्त व्यक्तीला अथवा प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबातील तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला नोकरीविषयक सवलतीच्या संदर्भात दिलेला दाखला/प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**४.१.१२ भूकंपग्रस्त असल्याचा पुरावा :-**

संबंधित जिल्हाधिकारी यांनी वितरित केलेला भूकंपग्रस्त असल्याचा दाखला/प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्जासोबत सादर/अपलोड करणे आवश्यक आहे.

**४.१.१३ पदवीधर अंशकालीन कर्मचारी असल्याचा पुरावा:-**

संबंधित तहसीलदार यांनी वितरित केलेला अनुभवाचा दाखला/प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्जासोबत सादर/अपलोड करणे आवश्यक आहे.

**४.१.१४ विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा** :-

विवाहित स्त्रियांना विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नांवात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नांवात बदल झाल्यासंबंधीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

**४.१.१५ लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन** :-

(१) विहित नमुन्यानुसार स्टँप पेपर नसलेल्या साध्या कागदावर टंकलिखित करून प्रतिज्ञापन सादर करावे.

(२) विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पडताळणीच्या कोणत्याही टप्प्यावर फक्त विवाहित उमेदवारांनीच सादर करणे आवश्यक आहे.

**४.१.१६ अनुभवाचा पुरावा**:-

(१) जाहिरातीत नमूद केलेल्या विहित प्रकारचा व अर्जामध्ये दावा केलेला अनुभव असल्याबद्दलचे दिनांकासह कार्यालयाच्या नाममुद्रित पत्रावर (Letter Head) विहित नमुन्यामध्ये अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) अनुभव प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या विहित नमुन्यामध्येच सादर करणे अनिवार्य आहे.

**४.२.१७ वैध अनुज्ञप्तीचा (Licence) पुरावा (फक्त सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षेकरीता)** :-

(१) मोटार सायकल, हलके मोटार वाहन आणि जड वाहतूक वाहन अथवा जड प्रवासी वाहन यापैकी एक, अशी तीन वाहने चालविण्याची वैध अनुज्ञप्ती आवश्यक आहे.

(२) मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत जड वाहतूक वाहन अथवा जड प्रवासी वाहन अनुज्ञप्ती उपलब्ध नसल्यास अशी अनुज्ञप्ती नियुक्ती नंतरच्या दोन वर्षाच्या परीविक्षा कालावधीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक असेल.

(३) परीविक्षा कालावधीमध्ये अनुज्ञप्ती प्राप्त न करणा-या उमेदवारास सेवेतून कमी करण्यात येईल.

(४) अखंडितपणे नूतनीकरण केल्याचा वैध पुरावा.

(५) अनुज्ञप्तीवरील सर्व तपशीलवार माहिती देणा-या परिवहन कार्यालयाच्या प्रमाणपत्राची प्रत.

**४.१.१८ अर्हता, अनुभव व मराठीचे ज्ञान असल्याचा पुरावा (फक्त दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षेकरीता)** :-

**(१) वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता यांच्याकरीता:-**

(एक) बार कौन्सिल यांच्याकडून प्राप्त झालेले वकिली व्यवसायाच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

(दोन) संबंधित जिल्ह्याचे मुख्य जिल्हा न्यायाधीश यांनी दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.

**(२) नवीन विधी पदवीधराकरिता:-**

(एक) ज्या विधी अभ्यासक्रमासाठी (LLB/LLM) प्रवेश घेतला होता, त्या महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा महाविद्यालय/विद्यापिठाचे विभागप्रमुख यांनी दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.

(दोन) प्रमाणपत्रामध्ये विधी शाखेतील पदवी, अभ्यासक्रमाचे प्रत्येक वर्ष प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करुन पदवी प्राप्त केली असल्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे. तसेच विधी पदवीच्या अंतिम वर्षास किमान ५५% इतके गुण पहिल्या प्रयत्नात प्राप्त केले आहेत किंवा विधी मधील पदव्युत्तर पदवी किमान ५५% इतक्या गुणांनी उत्तीर्ण झाल्याचा उल्लेख असणे आवश्यक.

(तीन) LLB च्या पदवी प्रमाणपत्रासह शेवटच्या वर्षाच्या गुणपत्रिकेची प्रत.

**(३)** मा. उच्च न्यायालयाचे लिपिकवर्गीय कर्मचारी-ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवेत आहे, अशा विभाग / कार्यालय प्रमुखांनी दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.

**(४)** दुय्यम न्यायालयातील लिपिकवर्गीय कर्मचारी-ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवेत आहे, अशा विभाग / कार्यालय प्रमुखांनी दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.

**(५)** मंत्रालयातील विधी व न्याय विभागातील विधी सहायक - ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवेत आहे, अशा विभाग / कार्यालय प्रमुखांनी दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.

(६) मा. उच्च न्यायालय, शहर दिवाणी न्यायालय आणि जिल्हा न्यायालय यामधील सरकारी वकिलांच्या कार्यालयातील लिपिकवर्गीय कर्मचारी- ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवेत आहे, अशा विभाग / कार्यालय प्रमुखांनी दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.

(७) विशेष परिस्थितीत पुर्ननियुक्त /सेवानिवृत्त दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांनी दिलेले प्रमाणपत्र.

(८) उपरोक्त सक्षम प्राधिका-यांनी दिलेल्या प्रमाणपत्रांमध्ये उमेदवारास मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, लिहिता व वाचता येते. तसेच मराठीचे इंग्रजीत व इंग्रजीचे मराठीत सुलभ रितीने भाषांतर करता येत असल्याचे स्पष्टपणे नमूद केले असणे आवश्यक राहील.

(९) अर्हतेबाबत उपरोक्त सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र विहित नमुन्यानुसार सादर करणे आवश्यक राहील.

(१०) शासनाच्या नियमानुसार नियुक्तीनंतर सहा महिन्यांच्या आत मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

### ४.१.१९ ओळखपत्राबाबत :-

परीक्षा शारीरिक चाचणी, मुलाखत अथवा प्रमाणपत्र तपासणीच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, आधार पीव्हिसी कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची एक छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

### ४.१.२० प्रमाणपत्राचे नमुने :-

(१) शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या सर्वसाधारण आदेशानुसार विहित करण्यात येणारे प्रमाणपत्राचे नमुने संबंधित दाव्यासाठी आधारभूत मानण्यात येतील.

(२) विहित प्रमाणपत्राचे नमुने आयोगाच्या संकेतस्थळावर DOWNLOADS या सदरामध्ये उपलब्ध आहेत.

(३) संबंधित जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास (दोन टप्प्यातील परीक्षांच्या बाबतीत पूर्व परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक) वैध असलेली व त्यापूर्वी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून निर्गमित झालेली प्रमाणपत्रे पडताळणी करण्यासाठी ग्राह्य धरण्यात येतील.

## ४.२ महत्वाची सूचना:-

(१) उपरोक्त कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कोणतीही अनावश्यक व अतिरिक्त कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करू नयेत.

(२) गुणपत्रिका अथवा सर्व प्रकारच्या प्रमाणपत्रांच्या पाठीमागील मजकूरसुद्धा छायांकित (Copied) केला पाहिजे.

(३) प्रमाणपत्रे इंग्रजी अथवा मराठी व्यतिरिक्त इतर भाषेत असतील तर त्यांच्या छायांकित प्रतींसोबत अधिकृत भाषांतर (Authentic Translation) जोडणे आवश्यक आहे.

(४) आयोगाच्या धोरणानुसार पात्र ठरणा-या उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणीच्या आधारे उमेदवारांची संबधीत पदासाठी पात्रता तपासण्यात येईल.

(५) पात्रता/सवलतीसंदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे (Claimed) आवश्यक आहे. अर्जामध्ये केलेल्या प्रत्येक दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/सवलत देय होणार नाही अथवा उमेदवारी अंतिम समजण्यात येणार नाही.

(६) पात्रतेसंदर्भातील मूळ प्रमाणपत्राच्या पडताळणीनंतर संबंधित प्रमाणपत्रांच्या दोन स्व-स्वाक्षांकीत छायांकित प्रती (self attested zerox copies) प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

(७) एखाद्या विशिष्ट प्रकरणी कोणतेही मूळ प्रमाणपत्र, प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करण्यास अधिक कालावधी लागण्याची शक्यता असल्यास, विहित दिनांकाच्या किमान ७ दिवस अगोदर आयोगास मिळेल, अशा रितीने समर्थनीय कारणासह लेखी विनंती करणे आवश्यक राहील. लेखी विनंतीचा गुणवत्तेवर विचार करुन प्रकरणपरत्वे तसेच अपवादात्मक परिस्थितीतच अशी विनंती मान्य करण्याबाबत आयोगाकडून विचार करण्यात येईल. अशा प्रकरणी विनंती गुणवत्तेवर मान्य झाल्यासच मुलाखत अथवा शारीरिक चाचणी अथवा शिफारशीसाठी विचार करण्यात येईल.

(८) अर्जामधील प्रत्येक दाव्यांच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे विहित नमुन्यातील संबंधित कागदपत्रे सादर करणे अनिवार्य असून आयोगाच्या सूचनानुसार नसेल तर अन्य कोणत्याही प्रकारची कागदपत्रे/पुरावा स्वीकारण्यात येणार नाही.

(९) कोणत्याही दाव्यांच्या अनुषंगाने आयोगाकडे केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची सत्यता पडताळणी आयोगाकडून कोणत्याही त्रयस्थ यंत्रणेमार्फत कोणत्याही टप्प्यावर करण्यात येईल.

**प्रकरण क्रमांक—पाच**

# परीक्षा, शारीरिक चाचणी, मुलाखत इत्यादी

**५.१** परीक्षा संगणक प्रणालीवर आधारित अथवा लेखी स्वरुपात घेण्याचा निर्णय आयोगाकडून वेळोवेळी घेण्यात येईल व त्याप्रमाणे उमेदवारांना आयोगाच्या संकेतस्थळाद्वारे अवगत करण्यात येईल.

**५.२** आयोगाने निश्चित केलेल्या दिनांकास व ठिकाणी उमेदवारास परीक्षा, शारीरिक चाचणी, प्रमाणपत्र तपासणी अथवा मुलाखतीसाठी उपस्थित रहावे लागेल.

**५.३ परीक्षेस प्रवेश** :-

**५.३.१** परीक्षेचे ठिकाण, दिनांक व वेळ प्रवेश प्रमाणपत्राद्वारे कळविण्यात येईल. अर्जाद्वारे सादर केलेल्या दाव्यांच्या/माहितीच्या आधारे उमेदवारांना संबंधित परीक्षेसाठी देण्यात आलेला प्रवेश तात्पुरताच राहील. उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती ही खोटी वा चुकीची दिल्यामुळे किंवा पात्रतेच्या अटी पूर्ण करू शकत नसल्याचे अथवा जाहिरातीतील/अधिसूचनेतील तरतुदीनुसार पात्र ठरत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही वेळी आढळून आल्यास या परीक्षेतील त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.

**५.३.२** परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी साधारणपणे ७ दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येतील. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**५.३.३** प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.३.४** लघुसंदेशाद्वारे माहिती कळविण्याची सुविधा ही नेहमीच्या पध्दतीव्यतिरिक्त अतिरिक्त सुविधा आहे. तसेच, नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांक वापरात नसल्याने, नेटवर्क कव्हरेज क्षेत्रात नसल्यामुळे अथवा इतर कोणत्याही तांत्रिक कारणामुळे असे लघुसंदेश उमेदवारास प्राप्त न होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रवेश प्रमाणपत्राच्या उपलब्धतेबाबत उमेदवाराने परीक्षेपूर्वी स्वत: खातरजमा करणे आवश्यक राहील.

**५.३.५** परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे व्यक्तीश: संपर्क साधावा.

**५.३.६** परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी परीक्षा झाल्यावर आयोगाशी संपर्क साधल्यास परीक्षेसाठी उमेदवारीचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

**५.३.७** प्रवेश प्रमाणपत्र पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाही. प्रवेशप्रमाणपत्र आयोगाच्या संकेतस्थळावरुन स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डद्वारे स्वत:च्या खर्चाने उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे. प्रवेशप्रमाणपत्राची दुय्यम प्रत पोस्टाने पाठविण्याबाबत विनंती केल्यास ती मान्य केली जाणार नाही. याबाबतच्या पत्रांना उत्तरेही दिली जाणार नाहीत.

**५.३.८** परीक्षेच्यावेळी उमेदवाराने स्वत:चे तसेच संबंधित परीक्षेचे प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**५.३.९** परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैंकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**५.३.१०** परीक्षेच्या वेळी आयोगास सादर करण्यात येणा-या ओळखीच्या पुराव्याच्या प्रतींवर उमेदवाराने संबंधित समवेक्षकाच्या समक्ष स्वत:ची स्वाक्षरी (Self-Attestation) करणे बंधनकारक आहे.

**५.३.११** परीक्षा, शारीरिक चाचणी अथवा मुलाखतीसाठी निर्धारित केलेल्या वेळेपूर्वी संबंधित ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक आहे. विलंबासंदर्भाच्या कोणत्याही कारणाचा आयोगाकडून विचार केला जाणार नाही व यासंबंधीची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच परीक्षा झाल्यानंतर यासंबंधातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनाचा आयोगाकडून विचार केला जाणार नाही.

**५.३.१२** फक्त पेन, पेन्सिल, प्रवेश प्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.

**५.३.१३** आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच स्वत:च्या जबाबदारीवर ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**५.३.१४** आयोगाकडे केलेल्या अर्जास अनुसरून निवडप्रक्रियेच्या / परीक्षेच्या निकालाबाबत यथावकाश कळविण्यात येईल. निकाल अथवा परीक्षेच्या प्रवेशाबाबतची अंतरिम चौकशी अनावश्यक असल्याने आयोगाकडून त्याची दखल घेतली जाणार नाही.

**५.४ मुलाखत :-**

५.४.१ स्पर्धा परीक्षेद्वारे होणा-या भरतीसाठी मुख्य परीक्षेच्या जाहिराती/अधिसूचनेमध्ये नमूद एकूण पदसंख्येच्या साधारणपणे तीन पट उमेदवार निवडले जातील व मुलाखतीस बोलाविले जातील.

५.४.२ चाळणी परीक्षा तसेच स्पर्धा परीक्षेमध्ये एकसमान अंतिम गुण मिळालेले एकापेक्षा अधिक उमेदवार असल्यास अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

५.४.३ उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक कुवत किती आहे ते अजमावणे हा मुलाखतीचा उद्देश असतो.

५.४.४ मुलाखतीच्या वेळी विचारण्यात येणा-या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नांबरोबरच अर्ज केलेल्या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या, उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी, ग्रामीण क्षेत्रांच्या स्थितीबाबत त्याला असलेली माहिती आणि ग्रामीण जनतेच्या समस्या यासंबंधीचे तसेच मुलाखत समितीस उचित वाटतील असे प्रश्न याचा समावेश असतो.

५.४.५ स्पर्धा परीक्षेकरीता संबंधित परीक्षेच्या परीक्षा योजनेनुसार मुलाखतीकरीता गुण असतील.

५.४.६ विशिष्ट शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभवावर आधारित सरळ सेवा भरतीकरीता मुलाखत १०० अथवा ५० अथवा २५ गुणांची असेल.

५.४.७ मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे भरतीकरीता मुलाखत घेतली जात नाही.

५.४.८ विशिष्ट शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभवावर आधारित सरळ सेवा भरतीकरीता मुलाखतीमध्ये किमान ४१% गुण मिळविणा-या उमेदवाराचाच शिफारशीसाठी विचार करण्यात येईल. तसेच एखाद्या पदाच्या चाळणी परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण अंतिम निकालाकरिता एकत्रितपणे विचारात घ्यावयाचे असतील अशा प्रकरणी सुद्धा मुलाखतीमध्ये किमान ४१% गुण मिळविणा-या उमेदवाराचाच शिफारशीसाठी विचार करण्यात येईल.

५.४.९ आयोगाने निश्चित केलेल्या निकषाच्या आधारे अथवा चाळणी परीक्षेसाठी विहित केलेल्या सीमारेषेच्या आधारे अर्जात दिलेल्या माहितीनुसार मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

५.४.१० मुलाखत घेतलेल्या उमेदवारांना मुलाखतीनंतर शक्य तितक्या लवकर, त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही ते कळविण्यात येईल व शिफारस झालेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

**५.५ शारीरिक चाचणी:-**

५.५.१ स्पर्धा परीक्षेद्वारे होणा-या भरतीसाठी ज्या पदांच्या परीक्षा योजनेमध्ये शारीरिक चाचणीची तरतूद आहे. त्या पदांकरीता मुख्य परीक्षेच्या जाहिराती/अधिसूचनेमध्ये नमूद एकूण पदसंख्येच्या साधारणपणे चार पट उमेदवार निवडले जातील व शारीरिक चाचणी / मुलाखतीस बोलाविले जातील.

५.५.२ शारीरिक चाचणीच्या वेळी समितीने दिलेले गुण अंतिम असतील व ते उमेदवारांना शारीरिक चाचणीच्या ठिकाणी कळविण्यात येतील.

५.५.३ शारीरिक चाचणी समितीने दिलेल्या गुणांच्या अनुषंगाने उमेदवारांच्या कोणत्याही तक्रारी/आक्षेप यांची दखल शारीरिक चाचणीनंतर विचारात घेतली जाणार नाही. तसेच यासंदर्भातील अभिवेदने परस्पर दफ़्तरदाखल करण्यात येतील.

५.५.४ वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ आवश्यक असलेल्या अथवा तशी मागणी करणाऱ्या उमेदवारांची आयोगाकडून नियुक्त वैद्यकीय अधिकाऱ्याने तपासणी करुन मुदतवाढीची आवश्यकता असल्याचे प्रमाणित केल्याखेरीज मुदतवाढ देण्यात येणार नाही. यास्तव, अशा उमेदवारांनी त्यांच्याकरीता निर्धारित दिनांकास शारीरिक चाचणीच्या ठिकाणी उपस्थित राहणे, अनिवार्य आहे.

५.५.५ चालण्यासाठी व/अथवा प्रवासासाठी कोणत्याही माध्यमाचा आधार घेऊनही शारीरिक चाचणीच्या ठिकाणी उपस्थित राहणे शक्य नसल्यास व त्याप्रमाणे अस्थिव्यंगोपचार तज्ञ व तत्सम दर्जाच्या तज्ञ डॉक्टरांनी प्रमाणित केल्याशिवाय उमेदवारास वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ देण्यात येणार नाही.

५.५.६ अपरिहार्य कारणास्तव शारीरिक चाचणीकरीता देण्यात येणारी मुदतवाढ ही संबंधित पदभरतीकरीता निश्चित शारीरिक चाचणी कार्यक्रमाच्या अंतिम दिनांकापर्यंतच वैध असेल. संबंधित पदभरतीच्या शारीरिक चाचणीकरीता निश्चित अंतिम दिनांकानंतरच्या मुदतवाढीसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

५.५.७ गरोदर महिला उमेदवारास वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ अथवा इतर कोणतीही सूट देण्यात येणार नाही.

५.५.८ शारीरिक चाचणी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारीत प्रणालीद्वारे घेण्यात येईल.

५.५.९ शारीरिक चाचणीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराची उत्तेजक द्रव्ये प्रतिबंधक चाचणी (Anti Doping Test) आवश्यकतेनुसार घेण्यात येईल. यासंदर्भातील अहवालाच्या आधारे संबंधिताच्या उमेदवारी व शारीरिक चाचणीमधील कामगिरीबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत आयोगाकडून घेतलेला निर्णय उमेदवारांवर बंधनकारक असेल.

**५.६ प्रवासखर्च:-**

५.६.१ परीक्षेसाठी उपस्थित राहणा-या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देय नाही.

५.६.२ मुलाखत / शारीरिक चाचणी / प्रमाणपत्र पडताळणीसाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांनी आयोगासमोर स्वखर्चाने हजर होणे आवश्यक आहे.

५.६.३ व्यावसायिक अर्हता धारण करणा-या अथवा यापूर्वी कोणत्याही सेवेत नसलेल्या तसेच उत्पन्नाचे साधन नसलेल्या, म्हणजे बेरोजगार उमेदवारांना रेल्वेचे दुस-या वर्गाचे (सर्वसाधारण) भाडे आणि / किंवा रेल्वेची सोय नसलेल्या स्थानकांमधील प्रवासासाठी नेहमीचे बसभाडे (साध्या बसच्या भाड्याइतका) प्रवास खर्च देण्यात येतो. मात्र त्यांनी पुढील गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे :-

(१) प्रवास केल्याचा पुरावा म्हणून रेल्वेचे / बसचे तिकीट, तिकीट क्रमांक किंवा रेल्वे पावतीसारखा इतर कोणताही लेखी पुरावा सादर करणे.

(२) रेल्वेचे सर्वसाधारण द्वितीय वर्ग किंवा साध्या एसटी बसचे आरक्षण शुल्क अनुज्ञेय.

(३) प्रवास खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करण्यासाठी मुलाखतीच्या दिवशी पुरविण्यात येणारा नमुना आणि मागणी केलेल्या रकमेसाठी पावती सादर करणे.

(४) उमेदवार ज्या पदासाठी मुलाखत देण्याच्या उद्देशाने आला असेल त्या पदासाठी आवश्यक अर्हता, निकष असल्यास त्यानुसार, धारण करीत असल्याबद्दल सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे.

(५) रेल्वेतर्फे देण्यात येणा-या प्रवास सवलतीचा लाभ घेतला असल्यास वरील अटींच्या अधीन राहून (खर्च केलेल्या रकमेइतक्या) खर्चाची प्रतिपूर्ती केली जाईल.

**५.७** आयोगाकडे अर्ज केल्यानंतर संबंधित परीक्षा, शारीरिक चाचणी, मुलाखत अथवा निवडप्रक्रियेसंदर्भातील कोणतीही कार्यवाही केव्हा होणार, याबाबत उमेदवाराने सतर्क राहणे आवश्यक आहे. परीक्षा अथवा निवडप्रक्रियेसंदर्भातील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर यासंदर्भातील कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

# निकाल प्रक्रिया

## ६.१ उत्तरतालिका (Answer-key):-

वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या सर्व परीक्षांच्या बाबतीत उत्तरतालिका प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही आयोगाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येणाऱ्या धोरणानुसार राहील.

## ६.२ उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन:-

६.२.१ वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

६.२.२ राज्यसेवा पूर्व परीक्षेकरिता प्रश्नपत्रिका क्रमांक २ मधील Decision making and problem solving या घटकाकरीता नकारात्मक गुणांकन लागू नसेल.

६.२.३ एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५ % किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

६.२.४ एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

६.२.५ वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

## ६.३ गुणांची सीमारेषा:-

६.३.१ संबंधित परीक्षेच्या परीक्षायोजनेनुसार गुणांची सीमारेषा (Cut off Line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा निश्चित करताना गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने गुणांची किमान टक्केवारी राखण्यात येईल व सदर टक्केवारी प्रकरणपरत्वे आयोगाच्या धोरणानुसार राहील.

६.३.२ आयोगाच्या धोरणानुसार संबंधित परीक्षेच्या गुणांची सीमारेषा (Cut off Line) निकालानंतर आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

६.३.३ गुणांच्या सीमारेषे संदर्भात प्राप्त होणा-या कोणत्याही अभिवेदनाचा सर्वसाधारणपणे विचार करण्यात येणार नाही.

## ६.४ गुणांची पडताळणी करण्याबाबतची पद्धत:-

६.४.१ पूर्व /चाळणी परीक्षेकरिता गुणांची पडताळणी अथवा फेरतपासणी करण्याबाबतची निवेदने कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत.

६.४.२ पारंपरिक स्वरूपाच्या परीक्षा/उत्तरपुस्तिकेकरिता गुणांची पडताळणी करण्यात येते.

६.४.३ आयोगाकडून कोणत्याही परीक्षांच्या उत्तरपुस्तिकांचे फेरमुल्यांकन (Revaluation) कधीही केले जात नाही. फेरमुल्यांकनाबाबतची सर्व अभिवेदने कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरदाखल करण्यात येतील व या संदर्भात उमेदवारांना काहीही कळविले जाणार नाही.

६.४.४ निकाल जाहीर झाल्यानंतर प्रोफाईलमध्ये गुणपत्रक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत उमेदवाराने गुणांची पडताळणी करण्याकरिता अर्ज केल्यास त्याचा विचार केला जाईल. त्याकरिता विहित पद्धतीने अर्ज करणे तसेच प्रत्येक विषयाला आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या दराप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे.

## ६.५ समान गुण धारण करणा-या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी :-

६.५.१ अंतिम शिफारस यादी तयार करताना समान गुण धारण करणा-या पात्र उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी (Ranking) आयोगाद्वारे खालील निकषानुसार निश्चित करण्यात येईल:-

(1) Educational Qualification as on the last date of receipt of application in descending order as Ph.D., M. Phil, Post Graduation, Post Graduation by Distance Education.

(2) The date of acquiring higher qualification.

(3) Preferential qualification if so mentioned in the advertisement/Notification/Rule of Recruitment.

(4) If the experience is desired for the post in question then the experience on the last day of receipt of application.

(5) If a provision is made in the advertisement or Notification or Rule of Recruitment then Backward classes candidates in ST, SC, DT(A), NT(B), SBC, NT(C) in that order.

(6) Older in Age.

(7) Thereafter the ranking should be decided by the first letter of the surname as it appears alphabetically.

(8) For Departmental PSI Only

  (1) Degree+Maximum to Minimum experience in descending order.

  (2) 12th + Maximum to Minimum experience in descending order.

(3) 10th + Maximum to Minimum experience in descending order

६.५.२ याबाबत आयोगाचे त्या-त्यावेळचे धोरण व कार्यनियमावलीतील तरतुदी प्रभावी मानल्या जातील.

## ६.६ अंतिम निकाल व भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे (ऑप्टिंग आऊट)(स्पर्धा परीक्षांना लागू):

६.६.१ अंतिम निकालासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल:-

(१) सर्व भरतीप्रक्रियेकरीता अंतिम शिफारशीपूर्वी सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) स्पर्धा परीक्षेद्वारे बहुसंवर्गीय भरतीप्रक्रियेकरीता सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे प्रथम संवर्गाचा पसंतीक्रम सादर करण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी संबंधित उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

(३) स्पर्धा परीक्षेद्वारे बहुसंवर्गीय भरतीप्रक्रियेकरीता संबंधित उमेदवाराकडून प्राप्त पसंतीक्रमाच्या आधारे प्रचलित पध्दतीनुसार तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) तयार करण्यात येईल.

(३) बहुसंवर्गीय भरतीप्रक्रिया नसलेल्या स्पर्धा परीक्षांकरीता सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे प्रचलित पध्दतीनुसार तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) तयार करण्यात येईल.

(४) तात्पुरती निवड यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व त्याच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट)पर्याय सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

(५) तात्पुरती निवड यादी तसेच भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट) पर्याय सादर केलेल्या उमेदवारांचा विदा (Data) लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

(६) भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर करणाऱ्या उमेदवाराचा अंतिम निवडीकरीता विचार करण्यात येणार नाही. तसेच, उमेदवार गुणवत्ताधारक असला तरी नियुक्तीकरीता शासनाकडे शिफारस करण्यात येणार नाही.

**६.६.२.** बहुसंवर्गीय भरतीप्रक्रियेकरीता पदांचे 'पसंतीक्रम सादर करणे' तसेच सर्व स्पर्धा परीक्षेद्वारे भरतीप्रक्रियेकरीता 'भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे' याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य असेल. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

**६.६.३.** भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर करण्यासंदर्भातील उपरोक्त कार्यपद्धत केवळ स्पर्धा परीक्षांकरीता लागू राहील. विशिष्ट अर्हता/विशिष्ट अनुभव आधारित सरळसेवा भरतीकरीता उपरोक्त निर्णय लागू करण्यात येणार नाही.

## ६.७ शिफारस :-

६.७.१ चाळणी परीक्षेद्वारे निवड (फक्त सरळसेवा भरतीप्रक्रियेसाठी):-

संबंधित पदाच्या परीक्षा योजनेनुसार चाळणी परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेण्याची तरतुद आहे; अशा प्रकरणी चाळणी परीक्षेतील गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. इतर सर्व सरळसेवा भरतीच्या प्रकरणी मुलाखतीमधील गुणांच्या आधारे प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी अंतिम निवड करण्यात येईल.

६.७.२ उमेदवार कोणत्या प्रवर्गाचा आहे अथवा उमेदवाराने कोणत्या आरक्षित पदाकरिता दावा केला आहे, याचा विचार न करता सर्व पात्र उमेदवारांचा अमागास (सर्वसाधारण) पदांसाठी प्रथम विचार करण्यात येईल.

६.७.३ विशिष्ट प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदाकरिता त्याच प्रवर्गातील उमेदवाराचा विचार करण्यात येईल. तथापि, त्याकरिता उमेदवारांनी त्यांच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले व विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६.७.४ शासनाच्या मागणीनुसार विविध आरक्षणाच्या अधीन राहून, तसेच विविध पदांसाठी उमेदवारांनी दिलेले पसंतीक्रम विचारात घेऊन (लागू असेल तेथे) अंतिम निकालातील गुणवत्ताक्रमाप्रमाणे भरावयाच्या पदसंख्येइतक्या उपलब्ध जागांवर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यात येईल.

६.७.५ अंतिम निकालाआधारे उपलब्ध पदांच्या संख्येइतक्या उमेदवारांचीच निवड केली जाईल. शिफारसपात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलमध्ये शिफारसपत्रे उपलब्ध करुन देण्यात येतील.

६.७.६ शिफारस केलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

६.७.७ प्रवर्ग म्हणजे सामाजिक तसेच समांतर आरक्षणासाठी शासनाकडून विहित करण्यात आलेला आरक्षित प्रवर्ग.

## ६.८ प्रतीक्षा यादी :-

प्रतीक्षा यादीबाबत आयोगाने वेळोवेळी ठरविलेले धोरण लागू राहील.[१]

[१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी.६७/प्र.क्र.२०७/कार्या.१२, दिनांक २ ऑगस्ट, २०१९

**६.९ गुणपत्रिका :-**

६.९.१ परीक्षा-योजनेनुसार ज्या परीक्षेकरिता उमेदवारांना गुण कळविले जातात, त्या परीक्षेकरिता सर्व विषयांना उपस्थित असलेल्या परंतु लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी अथवा शारीरिक चाचणीसाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांना गुणपत्रिका लेखी परीक्षेच्या निकालानंतर आयोगाच्या https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

६.९.२ अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर मुलाखतीस अथवा शारीरिक चाचणीस उपस्थित असलेल्या व मुलाखत अथवा शारीरिक चाचणी झालेल्या प्रत्येक उमेदवारास त्याचे विषयवार व मुलाखतीचे गुण, तसेच शारीरिक चाचणीचे गुण (लागू असेल तेथे) दर्शविणारी गुणपत्रिका https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावरील उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

**६.१० उत्तरपत्रिकेची प्रत व इतर तपशील:-**

६.१०.१ वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पध्दतीच्या पेपरच्या उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज अथवा परीक्षा संगणक प्रणालीवर आधारित आयोजित करण्यात आली असल्यास उमेदवारांनी सोडविलेल्या उत्तराचा पर्याय आयोगाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या धोरणानुसार आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे संबंधित उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे खालील तपशिलासह उपलब्ध करुन देण्यात येईल:-

(१) मूळ उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज अथवा संगणक प्रणालीवर आधारित परीक्षांच्या बाबतीत उमेदवाराने सोडविलेल्या उत्तराचा पर्याय

(२) निकालाकरीता गृहित गुण

(३) उमेदवार पात्र असलेल्या आरक्षित प्रवर्गाकरीताच्या गुणांची किमान सीमांकन रेषा

६.१०.२ उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज अथवा उत्तराचा पर्याय उपलब्ध करुन दिल्यानंतर यासंदर्भातील कोणतेही निवेदन / अभिवेदन विचारात घेतले जाणार नाही.

६.१०.३ पारंपरिक पध्दतीच्या पेपरची उत्तरपत्रिका उमेदवारांना प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. तथापि, सदर उत्तरपत्रिका माहितीचा अधिकार अधिनियमानुसार संबंधित उमेदवाराने अर्ज केल्यास केवळ त्या उमेदवाराचीच उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देण्यात येईल.

**प्रकरण क्रमांक-सात**

# सर्वसाधारण तरतुदी, सेवाप्रवेशोत्तर शर्ती इत्यादी

## ७.१ सर्वसाधारण तरतुदी :-

७.१.१ सर्व परीक्षांची प्रश्नपत्रिका/प्रश्नपुस्तिका तसेच उत्तरपत्रिका / उत्तरपुस्तिका ही आयोगाची मालमत्ता असून अनधिकृतपणे हाताळणा-या अथवा जवळ बाळगणाऱ्या व्यक्तीवर प्रचलित कायद्यानुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

७.१.२ आयोगाकडे अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल, उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंगविषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, आयोगास वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. आयोगाकडे अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल आयोगास न कळविल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी आयोगाकडून रद्द करण्यात येईल.

७.१.३ आयोगामार्फत शिफारस झाल्यावर सार्वजनिक सेवेत उमेदवार योग्य आहे, असे सर्व चौकशीनंतर आढळून आले, तरच शासनाकडून नेमणूक करण्यात येते.

७.१.४ शिफारशीनंतर नियुक्तीविषयक पुढील कार्यवाही शासनाकडून करण्यात येते.त्यामुळे नेमणुकीसंबंधीच्या पत्रव्यवहाराची दखल आयोगाकडून घेतली जात नाही. अंतिम निकालानंतरचा/शिफारशीनंतरचा सर्व पत्रव्यवहार शासनाच्या संबंधित विभागाकडे करावा.

७.१.५ शासन नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवारांना वैद्यकीय मंडळाकडून शासनाच्या निर्देशानुसार वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागेल. वैद्यकीय मंडळाकडून शारीरिक व मानसिकदृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणित झाल्यानंतरच शासनाकडून संबंधित सेवेसाठी नियुक्ती केली जाते.

७.१.६ एकापेक्षा अधिक पत्नी हयात असणारा कोणताही पुरुष महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखालील सेवेतील नियुक्तीस पात्र असणार नाही.मात्र अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीच्या अधीन राहून कोणत्याही व्यक्तीला हा निर्बंध लागू करण्यापासून सूट देण्यास विशेष कारणे आहेत अशी शासनाची खात्री पटल्यानंतर अशी सूट देण्याचे अधिकार शासनास आहेत.

७.१.७ एक पत्नी हयात असणा-या पुरुषाशी विवाह केलेली कोणतीही स्त्री महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखालील सेवेत नियुक्त केली जाण्यास पात्र असणार नाही, मात्र त्या स्त्रीस हा निर्बंध लागू करण्यापासून सूट देण्यास विशेष कारणे आहेत याची खात्री पटल्यानंतर अशी सूट देण्याचे अधिकार शासनास आहेत.

७.१.८ नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवारांना शासन-सेवेच्या अथवा संबंधित संवर्गाच्या सर्वसाधारण शर्तीनुसार किंवा विशेष आदेशानुसार शासनाने विहित केलेले करारपत्र / बंधपत्र / वचनपत्र इत्यादी विशिष्ट स्वरूपात भरुन दिल्याशिवाय त्यांना नियुक्ती दिली जाणार नाही.

## ७.२ महसुली विभाग वाटप नियम :-

महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम २०२१ लागू असलेल्या संवर्गाकरिता उमेदवाराची आयोगाकडून शिफारस झाल्यानंतर विहित प्रमाणपत्रे व अन्य कागदपत्रांची पडताळणी झाल्यावर महसुली विभाग वाटप करण्यासाठी संबंधित नियमातील तरतुदीनुसार उमेदवारास सक्षम प्राधिका-याकडून महसुली विभाग वाटप करण्यात येईल.

## ७.३ कामाचे ठिकाण आणि पदग्रहण अवधी :-

निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्तीचे आदेश काढण्यात आल्यानंतर ताबडतोब कामावर रुजू होणे आवश्यक असते आणि ती पदे जेथे असतील अशा ठिकाणी किंवा महाराष्ट्र राज्यात अशाच प्रकारची पदे जेथे असतील किंवा भविष्यात निर्माण करण्यात येतील त्या इतर कोणत्याही ठिकाणी उमेदवारांना काम करावे लागेल.

## ७.४ परिविक्षा कालावधीतील वेतन :-

७.४.१ परिविक्षाधीन व्यक्तीला पहिल्या वर्षी वेतन श्रेणीतील किमान दरानुसार वेतन देण्यात येते. उच्च प्रारंभिक वेतन जेथे अनुज्ञेय आहे त्या प्रकरणी उच्च प्रारंभिक वेतन मंजूर करण्याबद्दलचा निर्णय शासनाकडून घेण्यात येतो.

७.४.२ अगोदरपासूनच महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या व्यक्तीचे वेतन, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ चे संरक्षण देऊन त्या नियमावलीनुसार असलेल्या वेतन श्रेणीत निश्चित करण्यात येते.

७.४.३ पहिली वेतनवाढ परिविक्षा कालातील पहिले वर्ष पूर्ण झाल्यानंतर देण्यात येते आणि नंतरची वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर देण्यात येते.

७.४.४ विहित मुदतीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे किंवा नैमित्तिक रजेव्यतिरिक्त इतर रजा घेतल्यामुळे परिविक्षा काल वाढविण्यात आला असेल त्या बाबतीत, त्या पदाचा परिविक्षा काल समाधानकारक रितीने पूर्ण केल्यानंतर व दीर्घकालीन नियुक्ती झाल्यानंतर दुसरी किंवा नंतरची वेतनवाढ आणि वेतनवाढीची थकबाकी देण्यात येते.

७.४.५ असमाधानकारक कामामुळे परिविक्षा कालावधी वाढविण्यात आल्यास त्या बाबतीत, परिविक्षा काल समाधानकारक रितीने पूर्ण केल्याच्या दिनांकापासून दुसरी वेतनवाढ देण्यात येते आणि त्याबद्दलची कोणतीही थकबाकी अनुज्ञेय नसते.

## ७.५ सेवाप्रवेशोत्तर शर्ती:-

७.५.१ जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७.५.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७.५.३ शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा ४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू ठरेल. मात्र, सध्या अस्तित्त्वात असलेली निवृत्ती वेतन योजना, म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम-१९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम-१९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

७.५.४ राज्य शासनाच्या सेवांमधील पदांवर नियुक्त करण्यात आलेले वैद्यकशास्त्रातील आणि अभियांत्रिकी मधील स्नातक (पदवीधर) यांच्यावर भारतामध्ये कोठेही किंवा आवश्यक असल्यास परदेशात सशस्त्र दलामध्ये (चार वर्षांच्या किमान कालावधीसाठी) किंवा संरक्षणविषयक प्रयत्नांशी संबंधित कामावर सेवा बजावण्याचे दायित्व असते. सशस्त्र सेवांमध्ये काम करण्याचे दायित्वही सेवेच्या पहिल्या १० वर्षांपुरते मर्यादित असून ४० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या पदवीधर अभियंत्यांना आणि ४५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या डॉक्टरांना ही तरतूद सर्वसाधारणपणे लागू होत नाही.

७.६ उमेदवारीच्या संदर्भात उमेदवाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडून आलेल्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही; अशी पत्रे परस्पर दफ्तरदाखल करण्यात येतील.

७.७ प्रस्तुत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील माहिती पदाचा तपशील देणा-या जाहिरात/अधिसूचनेचा भाग असून, उमेदवारांनी त्यांची प्रत डाऊनलोड करुन स्वत:कडे ठेवणे इष्ट राहील.

७.८ प्रस्तुत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील तरतुदी व जाहिरात / अधिसूचनेमधील तरतुदीबाबत विसंगती आढळून आल्यास जाहिरात / अधिसूचनेमधील तरतुदी अंतिम समजण्यात येतील.

७.९ परीक्षेकरिता अथवा अभ्यासक्रमाच्या संदर्भात आयोगाकडून कोणत्याही प्रकारचे संदर्भपुस्तक पुरविण्यात येत नाही. त्यामुळे अशा स्वरूपाच्या कोणत्याही चौकशीची दखल घेण्यात येणार नाही व अशा चौकशीच्या संदर्भातील पत्रे कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरदाखल करण्यात येतील.

७.१० आयोगाकडे केलेल्या अर्जास अनुसरुन आवश्यक माहिती वेळोवेळी कळविण्यात येईल. अथवा आयोगाच्या संकेतस्थळाद्वारे / वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध करण्यात येईल. परीक्षा योजनेतील तरतुदीनुसार ज्या परीक्षांचे गुण उमेदवारांना कळवावयाचे नाहीत, असे गुण, मुलाखतीचे स्वत:चे अथवा इतरांचे गुण, इतर उमेदवारांची माहिती, अर्जाच्या प्रती, कार्यवृत्त, निवडीसंदर्भातील संवेदनशील कागदपत्रे जसे उत्तरपत्रिका / उत्तरपुस्तिका, गुणपत्रके, शेरे, टिप्पण्या, अभिप्राय, पत्रव्यवहाराच्या प्रती, तज्ज्ञ / समिती सदस्यांची माहिती, प्रमाणपत्रांच्या प्रती, इत्यादी कोणत्याही कारणास्तव पुरविण्यात येणार नाहीत.

७.११ प्रस्तुत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती आयोगामार्फत घेण्यात येणा-या सर्व भरती परीक्षांकरिता सामाईक आहे. तसेच, ज्या परीक्षेसाठी जाहिरात / अधिसूचना विज्ञापित करण्यात आली आहे, त्या पदासाठी लागू असलेली सर्व माहिती संबंधित परीक्षेसाठी अर्ज सादर करताना अर्जाद्वारे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

७.१२ आयोगास सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे / अभिलेख ही आयोगाच्या अभिलेखाचा भाग होतील व ती गोपनीय मानली जातील.

७.१३ आपण आयोगाचे कर्मचारी आहोत, आयोगाशी संबंधित आहोत, त्यामुळे आयोगामार्फत घेतल्या जाणा-या परीक्षेत, मुलाखतीत आपल्या निवडीसाठी मदत करण्याची हमी / माहिती देणा-या व्यक्तींवर उमेदवाराने विश्वास ठेवू नये. आयोगामार्फत होणारी निवड नियमाप्रमाणे व गुणवत्तेच्या आधारे केली जाते. आपल्या निवडीबाबत कोणत्याही प्रकारची आमिषे / आश्वासने दाखविणा-या कोणत्याही इसमापासून अर्जदाराने दूर राहणे अगत्याचे व अर्जदारांच्या हिताचे आहे.

**प्रकरण क्रमांक-आठ**

# प्रश्नपत्रिका / प्रश्नपुस्तिका तसेच उत्तरपत्रिका / उत्तरपुस्तिका हाताळणी

## ८.१ सर्वसाधारण :-

प्रश्नपत्रिका / प्रश्नपुस्तिकेच्या तसेच उत्तरपत्रिका / उत्तरपुस्तिकेच्या हाताळणीसंदर्भात आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करणे अनिवार्य आहे.

## ८.२ पारंपरिक स्वरुपाच्या परीक्षेसाठी विशेष सूचना :-

(१) पत्र लिहिण्याचे अथवा अर्जदाराचे स्वत:चे नाव लिहावयाचे असते अशा प्रकरणी उदा. पत्रलेखनात पत्रलेखक म्हणून स्वत:चे अथवा इतर कोणतेही काल्पनिक नाव न लिहिता त्याऐवजी प्रश्नपत्रिकेमधील नमूद नाव अथवा इंग्रजी माध्यम असल्यास " XYZ" लिहावे व मराठी माध्यम असल्यास "अबक " लिहावे. याऐवजी अन्य अक्षरे लिहिली गेल्यास अथवा इतर कोणतेही काल्पनिक नाव लिहिल्यास सदर कृत्य गैरप्रकार करण्याच्या उद्देशाने केले, असे समजण्यात येईल.

(२) उत्तरपुस्तिकेवर स्वाक्षरी अथवा बैठक क्रमांक विहित ठिकाणाव्यतिरिक्त इतरत्र नमूद केला असेल, तसेच स्वत:चे नांव, सांकेतिक खुणा वा चित्र काढले असेल, अप्रस्तुत शब्द लिहिले असतील तर ते आक्षेपार्ह लिखाण समजण्यात येईल व अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

(३) उत्तरामध्ये मुद्दे प्रकर्षाने (highlight) दर्शविण्यासाठी मुदयांपूर्वी खुणा करणे, मुददा अधोरेखित करणे, अथवा अन्य कोणत्याही प्रकारे सांकेतिक खूण करुन मुद्दा किंवा उत्तराचा काही भाग प्रकर्षाने दर्शविणे, याकरिता मनाई आहे.

(४) उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्नाचे किंवा उपप्रश्नाचे "पूर्ण " उत्तर खोडले असेल, रदद केले असेल, रेघ मारलेली असेल अशा ठिकाणी कोणतीही सही न करता स्वत: फुली मारुन "रद्द केले" असे ठळक अक्षरात लिहावे. तथापि उत्तरामधील एखादा शब्द किंवा उत्तराचा भाग रदद केला असल्यास त्या ठिकाणी "रद्द केले" असे लिहिण्याची आवश्यकता नाही. तसेच अशा ठिकाणी समवेक्षक/पर्यवेक्षक यांची स्वाक्षरी घेण्याची आवश्यकता नाही.

(५) प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. उत्तराचा काही भाग किंवा एक उपप्रश्न एकीकडे व काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडून तदनंतर दुसरा दुसरीकडे सोडविल्यास दुसरा भाग/ उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.

**प्रकरण क्रमांक-नऊ**

# गैरप्रकार / गैरप्रकाराचे प्रयत्न प्रकरणी कारवाई

## ९.१ गैरप्रकार

आयोगाकडून राबविण्यात येणा-या भरतीप्रक्रियेच्या अनुषंगाने उमेदवार अथवा उमेदवार नसलेल्या व्यक्तींनी केलेल्या पुढील कृतींना गैरप्रकार/गैरकृत्य समजण्यात येईल :-

(१) अर्जात हेतुपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा दाखल्याच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट अथवा विहित पध्दतीने वितरित न करण्यात आलेले दाखले / कागदपत्रे सादर करणे.

(२) परीक्षेसंबंधी आयोगाच्या मालकीचा कोणताही दस्तावेज उदा. उत्तरपत्रिका, परीक्षेच्या कालावधीमध्ये प्रश्नपुस्तिका, हजेरीपट, उमेदवारांची ओळखपत्रे फाडणे, फेकून देणे, सोबत घेऊन जाणे किंवा इतर अनधिकृत त्रयस्थ व्यक्तीकडे हस्तांतरित करणे.

(३) परीक्षेकरीता आयोगाकडून नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही कर्मचा-यास उदा. समवेक्षक, पर्यवेक्षक, लिपिक, परीक्षा उपकेंद्रप्रमुख, सेवा पुरवठादार संस्थेचे कर्मचारी, सुरक्षा रक्षक, इत्यादी यांना त्रस्त करणे, धमकावणे अथवा शारीरिक इजा करणे अथवा तसा प्रयत्न करणे.

(४) निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणे उदा. परीक्षा कक्ष, मुलाखत कक्ष, शारीरिक चाचणीचे ठिकाण, आयोगाचे कार्यालय इत्यादी ठिकाणी अथवा परिसरात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करणे, घोषणाबाजी करणे, इतर उमेदवारांना धमकावणे, इत्यादी प्रकारचे गैरवर्तन करणे.

(५) निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणे उदा. परीक्षा कक्ष, मुलाखत कक्ष, शारीरिक चाचणीचे ठिकाण, आयोगाचे कार्यालय इत्यादी ठिकाणी घातक शस्त्र अथवा ज्वलनशील पदार्थासह प्रवेश करणे.

(६) निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणे उदा. परीक्षा कक्ष, मुलाखत कक्ष, शारीरिक चाचणीचे ठिकाण, आयोगाचे कार्यालय इत्यादी निषिध्द केलेल्या ठिकाणी स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, लेखन पॅड, पाऊच, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/साहित्य आणणे आणि / अथवा स्वत:जवळ बाळगणे आणि/अथवा त्याचा वापर करणे आणि / अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेणे.

(७) निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणे उदा. परीक्षा कक्ष, मुलाखत कक्ष, शारीरिक चाचणीचे ठिकाण, आयोगाचे कार्यालय इत्यादी ठिकाणच्या पायाभूत सुविधा/ सामग्री यांची कोणत्याही प्रकारची नासधूस करणे अथवा विद्रुप करण्याचा प्रयत्न करणे.

(८) स्वत:च्या उमेदवारीच्या अनुषंगाने स्वत: अथवा इतर व्यक्तींकरवी अवैध मार्गाने निवडप्रक्रियेवर प्रभाव टाकणे अथवा प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे.

(९) निवड प्रक्रियेसंदर्भातील कोणत्याही महत्वाच्या कागदपत्रांवर अश्लील अथवा अन्य आक्षेपार्ह लिखाण करणे आणि/अथवा चित्रे/आकृत्या रेखाटणे.

(१०) परीक्षेच्या उत्तरपुस्तिकेवरील सूचनांचे उल्लंघन करुन उत्तरपुस्तिकेशी छेडछाड करणे आणि/अथवा उत्तरपुस्तिका यांवर धमकावणारे लिखाण करणे आणि/अथवा स्वत:ची ओळख दर्शविणारी कोणतीही चिन्हे लिहिणे किंवा उत्तरपुस्तिकेत कोणताही असा मजकूर लिहिणे, जो आयोगाच्या मते उमेदवाराची ओळख दर्शविण्यास मदत करेल.

(११) तोतयेगिरी करणे अथवा करण्याचा प्रयत्न करणे आणि/अथवा कोणत्याही तोतया व्यक्तीची मदत घेणे अथवा मदत घेण्याचा प्रयत्न करणे.

(१२) उमेदवाराची कोणतीही कृती जी आयोगाच्या मते भरती प्रक्रियेच्या न्याय्य व नि:पक्ष आयोजनावर प्रभाव पाडते.

(१३) अवैध मार्गाने प्रश्नपत्रिका मिळविणे अथवा मिळविण्याचा प्रयत्न करणे, प्रश्नपत्रिका फोडणे अथवा फोडण्याचा प्रयत्न करणे, बनावट प्रश्नपत्रिकांची विक्री करणे अथवा परीक्षेत अनधिकृत साहित्याआधारे नक्कल करणे अथवा तत्सम गैरप्रकाराचा प्रयत्न करणे.

(१४) एखाद्या विशिष्ट निर्णयासाठी संघटितपणे अथवा असंघटितपणे कोणत्याही माध्यमातून आयोगावर दबाव आणणे अथवा दबावाचा प्रयत्न करणे.

(१५) अर्जामधील सर्व दावे / माहितीची सत्यता तपासण्यासाठी आयोगाने मागणी केलेल्या आवश्यक कागदपत्रांचा पुरावा आयोगाच्या सुचनेनुसार कोणत्याही टप्प्यावर सादर न करणे.

(१६) अर्जामधील दावा/माहिती आणि निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर सादर केलेल्या कागदपत्रांमधील दावा यामध्ये फरक/तफावत आढळून येणे.

(१७) आयोगाशी पत्रव्यवहार करताना हेतूपुरस्सर वस्तुस्थितीदर्शक माहिती नमूद न करणे, वस्तुस्थिती दडविणे, पुराव्याविना माहिती देणे, पत्रव्यवहारामध्ये खोटे/दिशाभूल करणारे आरोप करणे.

(१८) अर्जाद्वारे आयोगाकडे केलेला दावा अथवा सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे निवडीच्या अथवा निवडीनंतरच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव खोटी, बनावट, खाडाखोड केलेली, अवैध, संबंधित शासन आदेश/नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम प्राधिका-याने प्रदान केली नसल्याचे आढळून येणे.

(१९) आयोगाचे मा.अध्यक्ष किंवा आयोगाचे कोणतेही मा. सदस्य किंवा आयोगास सहाय्य करणारे तज्ञ किंवा परीक्षक इत्यादी यांना उमेदवाराने अथवा उमेदवाराच्या वतीने कोणत्याही व्यक्तीने उमेदवाराच्या निवडीच्या अनुषंगाने दबाव आणण्याचा, प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे.

(२०) स्वत:स अकारण / गैरवाजवी फायदा होण्यासाठी अथवा आयोगाकडून व्यापक प्रसिध्दी देण्यापूर्वीची कोणत्याही स्वरुपाची माहिती मिळविण्यासाठी आयोगाच्या कर्मचा-यांवर गैरवाजवी प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे.

(२१) भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल आणि समाज माध्यमांद्वारे आयोगावर चुकीचे आरोप करणे, की ज्यामध्ये आयोगाचे मा. अध्यक्ष किंवा आयोगाचे मा. सदस्य किंवा आयोगास सहाय्य करणारे तज्ञ किंवा परीक्षक किंवा आयोगाचे अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द निदर्शने, घोषणाबाजीद्वारे धाकदपटशा दाखवणे यांचा समावेश आहे.

## ९.२ गैरप्रकार प्रकरणी कारवाई

९.२.१ आयोगामार्फत राबविण्यात येणा-या परीक्षेत अथवा परीक्षेनंतरही कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार किंवा गैरप्रकाराचा प्रयत्न करणा-या उमेदवारांवर तसेच उमेदवार नसलेल्या परंतु गैरप्रकार करण्यास सहाय्यभूत ठरणा-या व्यक्तींवर महाराष्ट्र विद्यापीठ, मंडळ व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमधील गैरप्रकारास प्रतिबंध कायदा, १९८२ आणि प्रचलित कायदा व नियमानुसार फौजदारी अभियोग दाखल करुन कारवाई करण्यात येईल.

९.२.२ उपरोक्त कृत्यांपैकी प्रकरणपरत्वे एक किंवा अनेक कृत्य करणे किंवा करण्याचा प्रयत्न करणे किंवा करण्यास अपप्रेरणा देणे, यांकरीता संबंधित कायद्यानुसार फौजदारी अभियोग दाखल करण्यासह पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल:-

(१) संबंधित निवडप्रक्रियेस अनर्ह ठरविणे आणि/अथवा

(२) आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा अथवा निवडप्रक्रियांकरीता कायमस्वरुपी किंवा ठराविक कालावधीकरीता प्रतिरोधीत करणे

(३) गैरप्रकाराच्या अथवा गैरप्रकाराच्या प्रयत्नाच्या आधारे शासकीय नोकरी मिळविलेल्या उमेदवार/व्यक्तीची शिफारस रद्द करणे व त्यानुसार संबंधित विभाग/कार्यालयाकडून सेवा समाप्तीची कार्यवाही.

(४) उमेदवार शासकीय नोकरीत असल्यास, उचित नियमांनुसार संबंधित विभागामार्फत कारवाई

(५) संबंधित परीक्षेत उमेदवाराने मिळविलेल्या गुणांमध्ये वजावट करणे.

९.२.३ आयोगाकडून विहित करण्यात आलेल्या अर्हताविषयक अटी पूर्ण न करणा-या अथवा कोणत्याही प्रकारे गैरप्रकाराचा प्रयत्न करणा-या उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल आणि/किंवा सदर उमेदवार इतर योग्य अशा कारवाईस पात्र असेल.

९.२.४ उमेदवाराने निवड प्रक्रियेशी संबंधित ठिकाणी उदा. परीक्षा कक्ष, मुलाखत कक्ष, शारीरिक चाचणीचे ठिकाण, आयोगाचे कार्यालय इत्यादी निषिध्द केलेल्या ठिकाणी स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, लेखन पॅड, पाऊच, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/साहित्य बाळगल्यास सदर साधने/साहित्य आयोगाच्या अधिकारी/कर्मचारी अथवा संबंधित कामाकरीता आयोगाकडून नियुक्त इतर कर्मचारी यांच्याकडून जप्त करण्यात येतील.